मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २८५ ■ रविवार, २८ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# छत्रपती शिवाजी महाराजांचा 353 वा राज्याभिषेक दिन रायगडावर साजरा

## रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाकडून सर्वोतोपरी सहाय्य :एकनाथ शिंदे







**दैनिक युवक आधार महाराष्ट्र प्रतिनिधी** : युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार 353 वा राज्याभिषेक दिन सोहळा आज दुर्गराज रायगडावर पारंपरिक उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून राज्य शासन कार्यरत असल्याचे सांगत रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य केले जाईल, अशी ग्वाही दिली.

यावेळी व्यासपीठावर रोहयो मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास व पंचायत राज राज्यमंत्री योगेश कदम, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आचल दलाल, शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीचे अध्यक्ष सुनील पवार, कोकण कडा मित्र मंडळ रायगडचे अध्यक्ष रोहित पवार, उपाध्यक्ष संकेत वडके तसेच लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आपल्या भाषणात दुर्गराज रायगडाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. रायगडावरील पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गुरुत्वाकर्षण आधारित पाणीपुरवठा योजनेस तातडीने मान्यता देण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांच्या सन्मानाचा घालून दिलेला आदर्श शासनाच्या धोरणांत प्रतिबिंबित होत असून, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' कोणत्याही अडथळ्यांशिवाय निरंतर सुरू राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यंदा पाऊस लांबल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देताना त्यांनी सांगितले की, कमी पाऊस किंवा दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली तरी महायुती सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. शासकीय तिजोरीवर पहिला अधिकार अन्नदाता बळीराजाचाच आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. तसेच, रायगडासह महाराष्ट्रातील युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा प्राप्त १२ ऐतिहासिक गड-किल्ल्यांचे जतन, संवर्धन आणि जागतिक स्तरावर त्यांची कीर्ती वृद्धिंगत करण्यासाठी शासन पूर्ण क्षमतेने कार्यरत राहील, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रास्ताविकात रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी रायगड किल्ला आणि पायथ्याशी असलेल्या ऐतिहासिक वास्तूंच्या जतन व पुनरुज्जीवनासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी केली. पाचाड येथे उभारण्यात येणाऱ्या 'शिवसृष्टी' प्रकल्पासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मंजूर करण्यात आलेल्या 50 कोटी रुपयांच्या निधीचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी शासनाने सुमारे४० ते 85 एकर जागा संपादित केली असून, आगामी मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पास अंतिम मान्यता देऊन निधीत वाढ करण्यात यावी.

रायगड किल्ल्यावरील सखल भागातील भिंती, तटबंदी आणि पडझड झालेल्या ऐतिहासिक संरचनांच्या दुरुस्तीसाठी केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी केंद्र शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा, जेणेकरून संवर्धनाची कामे वेगाने पूर्ण होतील, अशी विनंतीही त्यांनी केली. तसेच, रायगड जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेवरील पडझड झालेल्या विश्रामगृहाच्या जागी आधुनिक व सुसज्ज विश्रामगृह उभारण्यात यावे, जेणेकरून गडावर येणाऱ्या शिवभक्तांना अधिक चांगल्या मुक्कामाची सुविधा उपलब्ध होईल, अशी मागणी त्यांनी केली. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी केलेल्या समन्वयपूर्ण कार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

सोहळ्याच्या प्रारंभी रायगड पोलीस दलाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांना शासकीय मानवंदना देण्यात आली. वैदिक मंत्रोच्चारांच्या वातावरणात पालखी सोहळा राजसदरेवर दाखल झाला. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात आला. त्यानंतर ढोल-ताशांचा गजर, पोवाडे, लोकनृत्ये, युद्धकला सादरीकरणे, शिवप्रेमी पथकांचे आकर्षक कार्यक्रम आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' च्या घोषणांनी संपूर्ण रायगड परिसर शिवमय झाला. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने पोलीस विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, महावितरण तसेच विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतूक, पार्किंग, सुरक्षा आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

# शाळा दत्तक योजनेतून वाहतूक शिस्तीचे संस्कार

## खारघर वाहतूक शाखेच्या पोलिसांचा आय टी एम स्किल डेव्हलपमेंट कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद

**दैनिक युवक आधार संतोष आमले :** श्री. राहुल खाडे, पोलीस उपआयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या 'शाळा दत्तक योजना २०२६–२०२७' अंतर्गत खारघर वाहतूक शाखेच्या आय टी एम स्किल डेव्हलपमेंट, खारघर येथे वाहतूक जनजागृती व प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी व शिक्षकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.



नवी मुंबई वाहतूक विभागाने वाहतूक नियमांचे प्रभावी प्रबोधन करण्यासाठी 'शाळा दत्तक योजना' सुरू केली असून, खारघर वाहतूक शाखेच्या हद्दीत एकूण ३० शाळा व महाविद्यालयांचा समावेश आहे. प्रत्येक शाळा व महाविद्यालय एका वाहतूक अंमलदाराकडे दत्तक देण्यात आले असून, संबंधित अधिकारी नियमितपणे विद्यार्थ्यांशी संवाद साधून वाहतूक शिस्तीचे महत्त्व पटवून देत आहेत.

या उपक्रमाअंतर्गत गुरुवार, दि. २५ जून २०२६ रोजी खारघर वाहतूक शाखेचे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सतीश शिदोरे, पोलीस हवालदार सतीश पवार व महिला पोलीस नाईक धायगुडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली आय टी एम स्किल डेव्हलपमेंटला भेट दिली.

यावेळी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा, झेब्रा क्रॉसिंगचा योग्य वापर, वाहतूक सिग्नलचे पालन, दुचाकीस्वारांसाठी हेल्मेटचा वापर, चारचाकीतील सीटबेल्टचे महत्त्व, वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर टाळणे तसेच सायकलस्वार व पादचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सतीश शिदोरे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, "वाहतूक नियमांबाबत कोणतीही अडचण, शंका किंवा सूचना असल्यास निःसंकोचपणे मांडाव्यात. तुम्हीच उद्याचे जबाबदार नागरिक आहात आणि सुरक्षित वाहतुकीसाठी तुमचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे."

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमास प्राचार्य यांच्यासह शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये ‘पुरवैय्या’ सांगीतिक संध्याकाळ

## बांगला संगीतकारांच्या हिंदी गाण्यांचा सुरांचा उत्सव

**दैनिक युवक आधार पनवेल(प्रतिनिधी) :** श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या वतीने आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख सहयोगाने ‘पुरवैय्या’ हा विशेष सांगीतिक कार्यक्रम रविवार, दि. २८ जून रोजी रात्री ८ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे संपन्न होणार आहे .

बांगला संगीतकारांच्या मधुर हिंदी गाण्यांचा अनोखा सुरांचा उत्सव पनवेलकर रसिकांसाठी एक आगळा-वेगळा अनुभव ठरणार आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य आहे.

**प्रवेश विनामूल्य; २८ जून रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात भव्य कार्यक्रम**

या कार्यक्रमात सुप्रसिद्ध कलाकारांचा सहभाग असून मुख्य निवेदक व सहआयोजक म्हणून पुष्कर श्रोत्री, गायक म्हणून अजित परब, अर्चना गोरे आणि मुक्ता जोशी तर निवेदिका व सह-आयोजिका म्हणून योगिनी पोफळे सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाचे लेखन प्रविण जोशी यांनी केले आहे.

# दिबांच्या नावासाठी उपोषण

## उपोषणकर्त्या रश्मिता पोपेटा यांना वाढता प्रतिसाद

**दैनिक युवक आधार पनवेल, (वार्ताहर) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाने शनिवारी चौथ्या दिवशी प्रकल्पग्रस्तांची एकजुट पाहायला मिळाली. उपोषणकर्त्या रश्मिता पोपेटा यांच्या प्रकृतीची चिंता व्यक्त करत असतानाच प्रकल्पग्रस्तांचा रोषही उफाळून आला. चिंचपाडा येथे आंदोलकांनी पोलिसांच्या उपस्थितीत रस्ता रोकोचा प्रयत्न केल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. पोलिसांनी समजूत काढल्यानंतर आंदोलन शांततेत सुरू राहिले. दरम्यान, मागणी मान्य न झाल्यास 6 जुलै रोजी मुंबईतील विधिमंडळावर भव्य मोर्चा काढण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

लोकनेते दि. बा. पाटील भूमिपुत्र सामाजिक संस्था, शिवभूमी रायगड प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्र समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हे आमरण उपोषण सुरू आहे. नवी मुंबईच्या उभारणीत तसेच प्रकल्पग्रस्त आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी दि. बा. पाटील यांनी दिलेले योगदान लक्षात घेता विमानतळाला त्यांचे नाव देणे हा भूमिपुत्रांचा न्याय्य अधिकार असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. चिंचपाडा चौकात शनिवारी झालेल्या सभेला मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त, महिला संघटना, विविध सामाजिक संघटना आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. रश्मिता पोपेटा यांनी प्रकृती खालावलेली असतानाही सभेत उपस्थित राहून आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यानंतर उत्स्फूर्तपणे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला असला तरी पोलिसांनी हस्तक्षेप करून




आंदोलकांना शांत केले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सरकारवर आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीची गंभीर दखल घेऊन शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. रश्मिता पोपेटा यांच्या प्रकृतीची काळजी व्यक्त करत अनेक प्रकल्पग्रस्तांनी त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. मात्र, विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत ठोस निर्णय होईपर्यंत आणि 6 जुलैच्या मुंबई मोर्च्यापर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय त्यांनी कायम ठेवला.

दरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबनदादा पाटील, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, मा.आ.मनोहर भोईर, जिल्हाप्रमुख दिपक निकम, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, महानगरप्रमुख ॲड.समाधान काशिद, शहर प्रमुख यतीन देशमुख आदींसह पदाधिकारी या आंदोलनात सहभागी होवून पाठींबा दर्शविला. तसेच सामाजिक संघटना, संस्था, पत्रकार संघटना सुद्धा या आंदोलनात सहभागी झाल्याने आंदोलनाची धार वाढली आहे.

# चार किलोमीटर लांब साडीला चौदा जागतिक पुरस्कार

## ग्रँड क्लिओच्या गौरवापासून कॅन्स सिल्व्हरपर्यंत : मुंबईच्या 'इन्फिनिट साडी' मोहिमेची २०२६ मधील जागतिक सर्जनशील महोत्सवांवर मोहोर

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर,मुंबई विभागीय संपादक** : मुंबई, २६ जून २०२६ — भारतीय कायद्यातील वैवाहिक बलात्काराला (Marital Rape) असलेला अपवाद रद्द करण्याच्या मागणीसाठी राबविण्यात आलेल्या प्रभावी सामाजिक जनजागृती मोहिमेला *'इन्फिनिट साडी' ला २०२६ मध्ये जागतिक स्तरावर मोठा सन्मान मिळाला आहे. या मोहिमेला Cannes Lions International Festival of Creativity 2026 मध्ये १ सिल्व्हर लायन तसेच Clio Health Awards 2026 मध्ये उद्घाटनाच्या Women's Health Grand Clioसह एकूण १४ क्लिओ पुरस्कार मिळाले आहेत.

ही मोहीम रेड डॉट फाउंडेशन (मुंबई) यांच्यासाठी क्लिक हेल्थ (कॅनडा), मीडियामेडिक कम्युनिकेशन्स (मुंबई) आणि इतर भागीदारांनी संयुक्तपणे विकसित केली होती.

मीडियामेडिक कम्युनिकेशन्सचे सह-संस्थापक आणि संचालक दिनेश चिंदरकर म्हणाले,

"उद्देश, संस्कृती आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश यांचा प्रभावी संगम घडवून आणणाऱ्या या मोहिमेचा भाग असल्याचा आम्हाला अभिमान आहे. क्लिओ हेल्थ आणि कॅन्स लायन्ससारख्या प्रतिष्ठित पुरस्कारांमधून मिळालेली ही जागतिक दखल हे सिद्ध करते की प्रभावी सहकार्याच्या माध्यमातून महत्त्वाच्या सामाजिक विषयांना जागतिक व्यासपीठ मिळू शकते आणि आवश्यक संवाद अधिक व्यापक पातळीवर पोहोचू शकतो."

या गौरवाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना रेड डॉट फाउंडेशनच्या सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुप्रीत के. सिंह म्हणाल्या, "'इन्फिनिट साडी' ही मोहीम न्याय आणि कायदेशीर संरक्षणाची मागणी करणाऱ्या महिलांचा आवाज अधिक बुलंद करण्यासाठी निर्माण करण्यात आली. हा सन्मान सामूहिक कृतीची ताकद आणि सर्जनशील कथनशैलीच्या माध्यमातून गंभीर सामाजिक प्रश्नांना मुख्य प्रवाहातील चर्चेचा भाग बनविण्याची क्षमता अधोरेखित करतो."




'इन्फिनिट साडी'ला मिळालेली ही जागतिक मान्यता सामाजिक परिवर्तनासाठी उद्देशपूर्ण सर्जनशीलतेची वाढती भूमिका अधोरेखित करते. महिलांची सुरक्षितता, समानता आणि कायदेशीर हक्क याविषयीचा संवाद अधिक व्यापक होत असताना, ही मोहीम सामूहिक आवाज आणि सर्जनशील जनजागृतीच्या बळावर समाजात जागरूकता निर्माण करून परिवर्तन घडवून आणण्याचे प्रभावी उदाहरण ठरली आहे.

या मोहिमेचा केंद्रबिंदू होता चार किलोमीटर लांबीचा, जगातील सर्वात लांब मानला जाणारा साडीचा पदर, ज्याची संकल्पना आणि रचना प्रख्यात फॅशन डिझायनर निवेदिता साबू यांनी केली होती. भारतीय दंड संहितेतून वैवाहिक बलात्कारावरील अपवाद हटविण्याच्या समर्थनार्थ हजारो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या या साडीवर भरतकामाद्वारे नोंदविण्यात आल्या. मुंबईतील रॉयल ऑपेरा हाऊस आणि त्यानंतर काळा घोडा येथे ही साडी याचिकेच्या (Living Petition) स्वरूपात प्रदर्शित करण्यात आली. या उपक्रमामुळे मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा सहभाग वाढला आणि महिलांचे हक्क, सन्मान आणि सुरक्षितता या विषयांवर देशभरात व्यापक चर्चा सुरू झाली.


# TET परीक्षेलाही पेपरफुटीचे ग्रहण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी | पनवेल दिपक कोळवणकर** : महाराष्ट्रातील लाखो शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांना मोठा धक्का बसला आहे. उद्या (२८ जून) होणारी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपरफुटीच्या संशयामुळे ऐन २४ तासांपूर्वी पुढे ढकलण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे पोलिसांनी केलेल्या कारवाईदरम्यान संशयितांकडून जप्त करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न मूळ TET प्रश्नपत्रिकेशी जुळत असल्याची प्राथमिक पडताळणी झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील सुमारे सहा लाख विद्यार्थी या परीक्षेसाठी सज्ज होते. अनेक उमेदवारांनी प्रवासाची तिकिटे काढली होती, निवासाची व्यवस्था केली होती, तर काही जण परीक्षा केंद्राच्या शहरात पोहोचले होते. मात्र एका पेपरफुटीमुळे त्यांच्या महिनोनमहिन्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले असून मानसिक, आर्थिक आणि शैक्षणिक नुकसान सहन करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

भिवंडी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर करण्यात आलेल्या




कारवाईत काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून मिळालेल्या कागदपत्रांची परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी पडताळणी केली असता प्रश्नपत्रिका मूळ प्रश्नपत्रिकेशी जुळत असल्याचे समोर आल्याची माहिती मिळत आहे. त्यानंतर तातडीने गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला.

यापूर्वी NEET आणि विविध भरती परीक्षांमधील पेपरफुटीमुळे परीक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. आता TET सारखी महत्त्वाची परीक्षाही त्याच विळख्यात अडकल्याने राज्यातील परीक्षा सुरक्षेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

विद्यार्थ्यांचा संतप्त सवाल आहे की, प्रत्येक वेळी पेपर फुटतो, परीक्षा रद्द होते, चौकशी समित्या नेमल्या जातात; पण पेपरफुटीचे सूत्रधार मात्र वारंवार कसे

**ठाणे जिल्ह्यातील भिवंडीत उघडकीस आला प्रकार, ६ लाख विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला**

सुटतात? प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच वारंवार शिक्षा का मिळते?

राज्य सरकारने या प्रकरणाची केवळ चौकशी करून थांबू नये. पेपरफुटीमागील संपूर्ण रॅकेट उद्ध्वस्त करून मुख्य आरोपींना कठोर शिक्षा करावी.

तसेच भविष्यात कोणतीही स्पर्धा परीक्षा पूर्णपणे सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने पार पडेल, यासाठी अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था आणि कठोर कायदेशीर यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे.

कारण हा प्रश्न केवळ एका TET परीक्षेचा नाही; तर लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा, त्यांच्या भविष्याचा आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा आहे.

# तरुणांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी व्यसनमुक्तीची गरज : प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : देशाची युवा पिढी ही भारताची खरी ताकद असून ज्ञान, विज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा विविध क्षेत्रांत भारतीय युवकांनी जागतिक स्तरावर आपला ठसा उमटविला आहे. मात्र, बदलत्या जीवनशैलीत वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेमुळे अनेक तरुणांचे शारीरिक व मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे तरुणांना व्यसनमुक्त करून त्यांना योग्य दिशा देणे ही आजची अत्यंत महत्त्वाची सामाजिक गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित 'नशा मुक्ती अभियान' कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी प्राचार्य डॉ. शिंदे म्हणाले की, व्यसनाधीनतेमुळे केवळ व्यक्तीचेच नव्हे तर संपूर्ण कुटुंब आणि समाजाचे नुकसान होते. युवकांची ऊर्जा, क्षमता आणि भविष्य




व्यसनामुळे उद्ध्वस्त होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे समाज, शासन, शैक्षणिक संस्था आणि कुटुंब या सर्वांनी एकत्रितपणे व्यसनमुक्तीसाठी जनजागृती करून युवकांना सकारात्मक जीवनमूल्यांची दिशा देणे आवश्यक आहे. "मी स्वतः कोणतेही व्यसन करणार नाही आणि इतरांनाही व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करीन," हा संकल्प प्रत्येक युवकाने स्वीकारला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत नशामुक्त भारताच्या निर्मितीसाठी व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला चांगला प्रतिसाद लाभला.

या प्रसंगी कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. अभय वडघुले, डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ. बी. सी. आहेर, प्रा. प्रवीण शार्दुल यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण शार्दुल यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. बी. सी. आहेर यांनी मानले. व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी अशा जनजागृतीपर उपक्रमांची आवश्यकता असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# दि. बा. पाटील यांच्या नावासाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाला स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनचा जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनचे अध्यक्ष सागरभाई संसारे तसेच पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल येथील चिंचपाडा येथे लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषणास बसलेल्या रेशमा पोपेटा यांना पक्षाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला.

यावेळी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी




केंद्र सरकार आणि राज्य सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव लवकरात लवकर देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. या वेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांमध्ये पनवेल तालुका अध्यक्ष दिलीप नाईक, पनवेल तालुका उपाध्यक्ष नरेश परदेशी, पनवेल शहराध्यक्ष प्रशांत सोनावणे आणि पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे यांचा समावेश होता.

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनने या नामांतराच्या मागणीला पूर्ण पाठिंबा देत आंदोलनाला आपला सक्रिय सहभाग कायम राहील, असेही स्पष्ट केले.

# सलग दोन दिवस सात जणांना चावणारा कुत्रा जेरबंद

**दैनिक युवक अध्यक्ष**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहरात लाईन आळी परिसरात सलग दोन दिवस सात जणांना चावणारा कुत्रा अखेरीस पनवेल महापालिकेच्या श्वान पथकाने जेरबंद केला आहे.एक फिरस्ता कुत्रा रस्त्यातील पादचाऱ्यांना चावत असल्याची माहिती स्थानिक नगरसेविका दर्शना भोईर यांना काही जागृत नागरिकांनी दिली. त्यांनी तातडीने उपजिल्हा रुग्णालयाचे आरोग्य निरीक्षक डॉ.भगवान गीते, डॉ.मधुलिका लाड यांच्याशी संपर्क साधून चावा बाधित रुग्णांना आवश्यक ते उपचार करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे महापालिकेच्या श्वान



पथकातील डॉग कॅचर निरीक्षक कल्पेश कदम, रोहित कदम, सुमित कदम, किरण सावंत, चालक संजय कदम आदींमार्फत परिसरात दोन दिवस शोध घेवून त्या कुत्र्याला ताब्यात घेतले आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

# जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेसाठी आरोग्य यंत्रणा सज्ज

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** पाच वर्षांखालील एकही बालक पोलिओ प्रतिबंधक लसीकरणापासून वंचित राहू नये, या उद्देशाने जिल्ह्यात रविवार, दि. २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील १ लाख ६६ हजार ५८२ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. देशभरात २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड तसेच जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. रेवती साबळे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणार आहे.

मोहिमेच्या दिवशी जिल्हाभरातील २ हजार ५४३ पोलिओ बुथवर बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत. त्यानंतर लसीकरणापासून एकही बालक वंचित राहू नये, यासाठी ग्रामीण भागात ३ दिवस आणि शहरी भागात ५ दिवस घरभेटींद्वारे विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे.


स्थलांतरित कुटुंबे, बांधकामस्थळे, विटभट्ट्या, वाड्या-वस्त्या तसेच दुर्गम भागातील बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी मोबाईल पथकांचे विशेष नियोजन करण्यात आले आहे. बसस्थानके, रेल्वे स्थानके आणि टोलनाक्यांवर १७१ ट्रान्झिट पथके, १५० मोबाईल पथके आणि ७ नाईट पथके कार्यरत राहणार आहेत. ६ हजार ६० लसीकरण कर्मचारी, १ हजार ६३६ घरभेट पथके आणि ७३९ पर्यवेक्षक मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आले आहेत.

प्रत्येक पाच वर्षांखालील बालकापर्यंत पोलिओ लसीकरण पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील बालकांना जवळच्या पोलिओ बुथवर घेऊन जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत यांनी पालकांना केले आहे.

आरोग्य विभागाने सर्व पालकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन एकही बालक राहू नये, प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब मिळावेत यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# पेपरफुटीचा शाप कधी संपणार...?

राज्यात पुन्हा एकदा पेपरफुटीच्या प्रकाराने शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाला मोठा तडा गेला आहे. ठाण्यात टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका लीक झाल्याचा संशय समोर आल्यानंतर २८ जून रोजी होणारी ही परीक्षा ऐनवेळी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. गैरप्रकार रोखण्यासाठी हा निर्णय आवश्यक असला,तरी त्याची सर्वाधिक किंमत लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांना मोजावी लागत आहे.या परीक्षेसाठी राज्यभरातील उमेदवारांनी अनेक महिने रात्रंदिवस अभ्यास केला,क्लासेसची फी भरली,प्रवासाची व्यवस्था केली,नोकरीची रजा घेतली आणि मानसिक तयारी केली होती.मात्र,काही मोजक्या भ्रष्ट आणि लोभी लोकांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या कष्टांवर एका क्षणात पाणी फिरले.ही केवळ परीक्षा रद्द होण्याची बाब नाही,तर विद्यार्थ्यांच्या आशा,मेहनत,वेळ,पैसा आणि विश्वास यांचा झालेला अपमान आहे.सर्वात गंभीर बाब म्हणजे,पेपरफुटीच्या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. राज्यात विविध भरती परीक्षा आणि



स्पर्धा परीक्षांमध्ये वारंवार प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना समोर येत आहेत. प्रत्येक वेळी चौकशी समित्या नेमल्या जातात,गुन्हे दाखल होतात,मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; पण काही दिवसांनी पुन्हा तोच प्रकार घडतो.याचा अर्थ सरकारच्या यंत्रणेत कुठेतरी गंभीर त्रुटी आहे किंवा दोषींना राजकीय अथवा प्रशासकीय संरक्षण मिळत आहे,अशी शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. सरकारने केवळ परीक्षा रद्द करून किंवा पुढे ढकलून आपली जबाबदारी संपली असे समजू नये. प्रत्येक पेपरफुटीनंतर विद्यार्थ्यांनाच पुन्हा अभ्यास,पुन्हा प्रवास,पुन्हा मानसिक तणाव आणि पुन्हा आर्थिक खर्च सहन करावा लागतो.या नुकसानीची जबाबदारी कोण घेणार?विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मौल्यवान वेळ परत कोण देणार? याचे उत्तर सरकारकडे आहे का? पेपरफुटी ही केवळ गुन्हेगारी नाही,तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर झालेला हल्ला आहे.ज्या व्यवस्थेने गुणवंत विद्यार्थ्यांना न्याय द्यायचा,तीच व्यवस्था जर भ्रष्टाचारासमोर हतबल ठरत असेल,तर तरुणांनी विश्वास ठेवायचा तरी कोणावर? प्रामाणिकपणे अभ्यास करणारा विद्यार्थी आणि पैशाच्या जोरावर प्रश्नपत्रिका मिळवणारा उमेदवार यांच्यातील लढत कधीच समान असू शकत नाही.त्यामुळे गुणवत्तेपेक्षा पैशाला महत्त्व मिळत असल्याचा धोकादायक संदेश समाजात जात आहे.सरकारने आता केवळ आश्वासनांचे राजकारण न करता कठोर कृती करणे गरजेचे आहे. पेपरफुटीच्या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करून त्यामागील सूत्रधार,संबंधित अधिकारी,परीक्षा प्रक्रियेशी संबंधित कर्मचारी आणि लाभार्थी यांच्यावर जलदगती न्यायालयातून कठोर शिक्षा झाली पाहिजे.परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे तंत्रज्ञानाधारित,पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रत्येक पेपरफुटीनंतर फक्त खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांवर कारवाई करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना अभय देण्याची प्रवृत्तीही थांबली पाहिजे.शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांच्या भविष्याशी असा खेळ कोणत्याही सुसंस्कृत राज्याला शोभणारा नाही.शिक्षण आणि रोजगाराच्या संधी या तरुणांच्या आयुष्याचा पाया असतात.तोच पाया जर भ्रष्टाचाराने पोखरला,तर उद्याच्या पिढीचा व्यवस्थेवरील विश्वास कायमचा उडेल. विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळणाऱ्यांना कोणतीही दया दाखवू नये.कारण प्रत्येक पेपरफुटी ही फक्त प्रश्नपत्रिकेची चोरी नसते; ती लाखो तरुणांच्या भविष्याची चोरी असते.आता प्रश्न फक्त एकाच परीक्षेचा नाही,तर राज्यातील संपूर्ण परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा आहे.सरकारने आता कृतीतून उत्तर द्यावे,अन्यथा "पेपरफुटीमुक्त परीक्षा" हे फक्त भाषणातील आश्वासनच राहील.

**– केतन भोज, मुंबई**



# पनवेल महापालिकेत महापुरुषांच्या जयंतीला परवानगी नाही पण बेकायदेशीर फॅशन शोला 'मूक संमती

## तत्कालीन आयुक्तांसह ,विद्यमान संबंधीत अधिकाऱ्यांवर 'ॲट्रॉसिटी' कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : लोकशाहीचा गळा घोटत आणि नोकरशाहीचा माज दाखवत पनवेल महानगरपालिकेच्या तत्कालीन आणि विद्यमान अधिकाऱ्यांनी महापुरुषांच्या जयंती कार्यक्रमाला खोडसाळपणे परवानगी नाकारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एकीकडे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला कायदा आणि नियमांचे बोट दाखवायचे आणि दुसरीकडे त्याच वडाळे तलावावर बेकायदेशीरपणे रंगणाऱ्या खाजगी 'महिला फॅशन शो'ला मूकसंमती द्यायची, असा पक्षपाती आणि दलित-बहुजन समाजविरोधी कारभार पनवेल पालिकेत सुरू असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते निलेश सोनावणे यांनी केला आहे .याबाबत मुख्यमंत्री फडणवीस ,सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट ,पोलीस आयुक्त नवी मुंबई ,विभागीय कोकण आयुक्त यांच्याकडे सोनावणे यांनी तक्रार करण्यात आली आहे.

याप्रकरणी पनवेल महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त मारुती गायकवाड,विद्यमान जबाबदार अधिकारी आणि परवाना विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम (Atrocities Act) आणि भारतीय न्याय संहिते (BNS) अंतर्गत तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते 'जागृती फाउंडेशन'चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी केली आहे.

२३ मार्च २०२२ रोजी पनवेल महापालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत (ठराव क्र. ४४२) तत्कालीन सभागृह नेते परेश ठाकूर व महापौर कविता चौतमोल यांच्या कार्यकाळात ऐतिहासिक 'वडाळे तलाव' परिसरात राजकीय कार्यक्रम वगळता सर्व खाजगी, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यास अधिकृत मंजुरी देण्यात आली होती.

परंतु, नगरसेवकांची मुदत संपताच प्रशासकीय हुकूमशाही गाजवत तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांनी लोकप्रतिनिधींचा मूळ ठराव बाजूला सारला. स्वतःच्या अधिकारात एक नवीन प्रशासकीय ठराव (क्र. ६७९) मंजूर करून महापुरुषांचे विचार आणि जयंती कार्यक्रम रोखण्यासाठी चक्रव्यूह रचला, असा थेट आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

'जागृती फाउंडेशन'च्या वतीने २१ मार्च २०२३ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महापुरुषांची जयंती साजरी करण्यासाठी वडाळे तलाव येथे परवानगी मागितली होती. मात्र, तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांच्या इशाऱ्यावरून परवाना विभागाने "या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक फिरण्यासाठी येतात, गर्दी असते," असे अत्यंत उथळ, हास्यास्पद आणि खोडसाळ कारण देत परवानगी नाकारली. उपायुक्त मारुती गायकवाड यांनी सोनावणे याना लेखी पत्र देऊन दलित व बहुजन समाजाला सार्वजनिक ठिकाणी एकत्र येण्यापासून रोखण्याचा कुहेतू साध्य केला.

ज्या वडाळे तलावावर महापुरुषांच्या जयंतीला नियमांचे डोस पाजले गेले, त्याच ठिकाणी १७ मे २०२६ रोजी एका खाजगी संस्थेने व्यावसायिक व मनोरंजनात्मक 'महिला फॅशन शो' चे जाहीर आयोजन केले होते. या फॅशन शोला कोणतीही अधिकृत परवानगी नसताना , पनवेल महानगर पालिका आयुक्त यांनी व पनवेल पालिकेच्या परवाना विभाग आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. उलट, डोळ्यांवर पट्टी बांधून 'बघ्याची भूमिका' घेतली. महापुरुषांच्या विचारांपेक्षा पालिकेला फॅशन शो महत्वाचा वाटला का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

या निंदनीय प्रकाराबाबत निलेश सोनावणे यांनी अधिकाऱ्यांनी दोन समाजात जातीय-धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे म्हटले आहे. या संबंधीत अधिकाऱ्यांवर अनुसूचित जातीच्या विरुद्ध द्वेष किंवा प्रतिकूलतेची भावना पसरवणे,सार्वजनिक ठिकाणी अनुसूचित जातीच्या समाजाचा जाणीवपूर्वक अपमान करणे अशी कृत्य केल्याने ॲट्रॉसिटी कायदा कलम ३(१)(u) कलम ३(१)(r) व ३(१)(s)

भारतीय न्याय संहिता (BNS): शांतता भंग करणे आणि कट रचणे..कलम ४ नुसार कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर करणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध कारवाई. कलमांनुसार FIR दाखल करण्याची मागणी केली आहे:

नोकरशाहीच्या या मनमानी जातीय तेढ निर्माण करण्याच्या पक्षपाती कारभारामुळे पनवेलमधील अनुसूचित जातीच्या नागरिकांच्या धार्मिक आणि सामाजिक भावना तीव्रतेने दुखावल्या गेल्या आहेत. "महापुरुषांच्या जयंतीला खोडा घालणारे आणि फॅशन शोला रेड कार्पेट अंथरणारे हे अधिकारी नेमके कोणाच्या इशाऱ्यावर काम करत होते?" असा सवाल सोनावणे यांनी उपस्थित केला आहे. शासनाने पोलिसांनी या प्रशासकीय अधिकाऱ्यांनावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निलेश सोनावणे यांनी केली आहे .

याबाबत पनवेल महानगर पालिका अधिकारी याना १५ मे २०२६ रोजीच कार्यक्रमाची परवानगी आहे का अशी विचारणा केली गेली मात्र तेव्हा बघतो पाहतो अशी उडवाउडवीची उत्तरे पालिका अधिकाऱ्यांकडून देण्यात आली १७ मे ला कार्यक्रम सुरु होत असताना संबंधित अधिकार्यांना ,परवानगी नसेल तर कार्यक्रम थांबवावा अशी विनंती केली तरी देखील कार्यक्रम करण्यात आला अधिकाऱ्यांना कार्यक्रम परवानगी शिवाय कसा केला गेला अशी विचारणा केली असता एका नगरसेवकांच्या खाजगी पी ए ने आयोजकांना कार्यक्रम करा असे सांगितले असल्याचे कर्मचाऱ्याने अधिकाऱ्याने सांगितले म्हणजे पनवेल महानगर पालिकेच्या परवानग्या न घेता पी ए ना एवढे अधिकार कोणी आणि कोणत्या कायदायद्वारे दिले गेले आहे

## पनवेलमध्ये अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला; ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर महिलेस उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही महिला बेशुद्ध अवस्थेत आढळून आली होती. तिचे अंदाजे वय 40 ते 45 वर्षे असून ती सावळ्या वर्णाची आहे. अंगात फिकट रंगाची साडी व ब्लाऊज परिधान केलेले होते. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नसून तिच्या नातेवाईकांचा अथवा परिचितांचा शोध सुरू आहे. सदर महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा संबंधित चौकशी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असेही पोलिसांनी नमूद केले आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे मो.नं.8591424350 किंवा पोउपनि. अनंत परागे मो.नं.8779659508 येथे संपर्क साधावा.

## ऑलीम्पिक दिवस, ऑलीम्पिक सप्ताह वृक्षारोपण आणि बीज उधळण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**विलास गायकवाड नाशिक प्रतिनिधी** : कालिका देवी मंदिर संस्थान, यशवंत व्यायाम शाळा, क्रीडा संस्कृती फाउंडेशन आणि दुधारे स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ ते ३० जून २०२६ दरम्यान ऑलिंपिक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. ऑलीम्पिक दिनाबरोबरच आज छत्रपती शाहू महाराज यांची जयंती देखील आहे या दोन्हीही महत्वाच्या बाबीचा मेळ घालून आज दिनांक २६ जून रोजी चमार लेणे येथे वृक्षारोपण आणि बीज उधळण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रपती शाहू महाराज यांना मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमासाठी आरंभ पब्लिक स्कुल, आत्मा मलिक स्कुल, रायन इंटरनाटोनल स्कुल, आदर्श स्कुल या शाळांचे १०७ विद्यार्थी आणि शिक्षक तसेच पंचवटी प्रभागाचे नगरसेवक प्रवीण जाधव, गणेश चव्हाण, मराठा महासंघाचे जिल्हा अध्यक्ष तथा माजी पोलिस अधिकारी चंद्रकांत बनकर, यशवंत व्यायाम शाळेचे अध्यक्ष दीपक पाटील, ओझर नगरपालिकेचे अध्यक्ष अशोक कदम, या उपक्रमाचे प्रमुख अशोक दुधारे, आनंद खरे, राजू शिंदे, अजिंक्य दुधारे, समन्वयक अविनाश ढोली, दीपक निकम, भूषण भटाटे, सौ. विजया दुधारे,अस्मिता दुधारे आणि खेळाडूंचे पालक . प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. .यावेळी या परिसरात १११ झाडांचे वृक्षारोपण आणि ५० हजार सीड बॉल ( बीज) यांचे उधळण करण्यात आले.

उपस्थित मान्यवारींनी सांगितले की निसर्ग संवर्धन याची आज फार गरज आहे. झाडे कामी होत आहेत. निसर्गाचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन करण्याचे काम महत्वाचे आहे. अश्या उपक्रमातून शाळेच्या विद्यार्थ्यांपासून याचे महत्व समजले तर समाजासाठी हे फार गरजेचे आहे अश्या भावना व्यक्त केल्या आणि या उपक्रमाचे कौतुक केले.

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कडा व पाटोदा येथे अकॅडमी सुरू करणार :– माजी आ. भीमराव धोंडे यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : आष्टी पाटोदा शिरूर हा परिसर दुष्काळी पट्टा समजला जातो या भागातील अनेक शेतकरी व शेतमजूर पोट भरण्यासाठी स्थलांतर करतात अशा गोरगरिबांच्या मुलांसाठी संस्थेच्या वतीने आष्टी व धानोरा येथे करियर अकॅडमी सुरू केलेली आहे आता पुढील महिन्यात कडा आणि पाटोदा येथेही करिअर अकॅडमी सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा संस्था अध्यक्ष व माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कडा येथे केली.



याबाबत अधिक माहिती अशी की शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद चॅरिटेबल संस्था व इतर संस्थेतील इयत्ता दहावी - बारावी मध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गुणवंताचा सत्कार ही २६ वर्षापासून चाललेली अखंडीत परंपरा आहे. त्या सत्कार प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. भीमराव धोंडे होते. यावेळी व्यासपीठावर महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, युवा नेते अभयराजे धोंडे, सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल भंडारी, ह.भ.प. आंधळे महाराज, पत्रकार उत्तमराव बोडखे,सुधीर ढोबळे, मधुकर शिरोळे, पांडुरंग महाराज कर्डीले, शहादेव खेडकर व इतर उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, शिक्षण घेताना कष्ट करणाऱ्या विद्यार्थ्यांना यश निश्चित मिळते. आपली संस्था गेल्या सव्वीस वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करीत आहे. सत्कारामुळे इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते. यापुढे संस्थेच्या प्रत्येक शाळेने ९० टक्के पेक्षा जास्त निकाल लावावा. गेल्या दोन वर्षांपासून आष्टी येथे करिअर अकॅडमी आहे. दोन वर्षांत दोनशे पेक्षा जास्त विद्यार्थी वेगवेगळ्या ठिकाणी नौकरीस लागले आहेत. आता धानोरा येथे त्या परिसरातील गोरगरीबांच्या मुलांसाठी धोंडे करिअर अकॅडमी सुरू केली आहे. याचा फायदा घ्यावा.पुढील महिन्यात कडा व पाटोदा येथे अकॅडमी सुरू करण्यात येणार आहे. अकॅडमी मध्ये विद्यार्थ्यांनी जाऊन नियमित सराव करावा तसेच अभ्यासिकेत अभ्यास केल्यास निश्चितच यश मिळेल. पालकांनी आपल्या मुला - मुलींना सकस आहार द्यावा. खेळामुळे जिवनात यशस्वी होता येते. संस्थेच्या वतीने येत्या दोन महिन्यांत सर्व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा घेण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, गेल्या २६ वर्षापासून संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ अखंडपणे सुरू आहे. आपल्या संस्थेच्या शाळा म्हणजे गुणवंतांची खाण आहे. सर्वच विद्यार्थ्यांना ही संधी प्राप्त होत नाही. गुणवत्ता सहज प्राप्त होत नाही, खुप कष्ट करावे लागते. याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, प्रा. सागर वाघुले, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले, उपप्राचार्य डॉ. संजय धोंडे यांच्यासह पालक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे निकाल वाचन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते, प्रा. डॉ. संभाजी ओव्हाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. शैलजा कुचेकर यांनी केले व उपस्थितांचे प्रा. डॉ. उपप्राचार्य डॉ . बापु खैरे यांनी आभार मानले .

## मालडुंगेमधील रेशन धान्याची माहिती काही महिने उलटूनही मिळत नाही, माहिती देण्यास पुरवठा विभागाची टाळाटाळ?

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** :मालडुंगे ग्रामपंचायत हद्दीतील रास्त भाव धान्य दुकानामध्ये होणाऱ्या धान्य वितरणाबाबत माहिती मिळवण्यासाठी ग्रामपंचायतीकडून दोन महिन्यांपूर्वी तहसील कार्यालयाला लेखी पत्र देण्यात आले होते. मात्र अद्यापही पुरवठा विभागाकडून संबंधित माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याने पुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मालडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सिताराम चौधरी व ग्रामसेवक यांनी तहसील कार्यालयातील पुरवठा अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन रास्त भाव धान्य दुकानात कोणत्या शिधापत्रिकाधारकांना (पिवळे, केशरी व अंत्योदय) किती प्रमाणात धान्य वितरित केले जाते, कोणत्या कार्डावर माणसी किती प्रमाणे धान्य दिला जातो याची सविस्तर माहिती तसेच धान्य वितरणाचे वेळापत्रक मागवले होते. मात्र दोन महिने उलटूनही या पत्राला कोणतेही उत्तर देण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. ग्रामपंचायत मालडुंगेचे सरपंच वारंवार या पत्राचा पाठपुरावा करत आहेत. ग्रामस्थांच्या मते, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पारदर्शकता राखण्यासाठी ही माहिती आवश्यक असून, सरपंच मालडुंगे ग्रामपंचायतीच्या अधिकृत पत्रालाही प्रतिसाद मिळत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पुरवठा विभागाकडून माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे संबंधित धान्य वितरणाची माहिती नेमकी का दिली जात नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या प्रकरणी वरिष्ठ प्रशासनाने लक्ष घालून ग्रामपंचायतीला तात्काळ माहिती उपलब्ध करून द्यावी, तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पारदर्शकता सुनिश्चित करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. याबाबत पुरवठा अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना अर्ज शोधण्यास सांगितले मात्र त्यांना अर्ज सापडला नाही.

दोन महिन्यांपूर्वी मी धान्याची माहिती मागवली आहे, यासाठी तहसीलदार कार्यालयात पत्र दिले, मात्र अद्याप उत्तर मिळाले नाही.- सीताराम चौधरी, सरपंच, मालडुंगे ग्रामपंचायत

## मोबाईल हॅक करून केली नवीन मोबाईलची खरेदी नवीन


**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : एपीके फाईल पाठवून मोबाईल हॅक केला आणि 75 हजार रुपये किमतीचा मोबाईल खरेदी करून फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 26 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.यातील फिर्यादी मनोजकुमार केवट हे डॉक्टर असून ते कामोठे येथे राहतात. आरोपींनी त्यांच्या मोबाईलवर व्हाट्सअप मेसेजने इ चलनची ईपीके फाईल पाठवली. त्यांनी ती ओपन केली असता त्यांचा मोबाईल हॅक झाला आणि एसबीआय क्रेडिट कार्ड वरून फ्लिपकार्ट मधून 75 हजार रुपये किमतीचा मोबाईल खरेदी केला आणि तो दिल्ली येथे डिलिव्हरी घेऊन त्यांच्या ऑनलाइन फसवणूक केली.

## समता मार्च २०२६ । सामाजिक न्याय दिन । लोकराजा शाहू महाराज जयंती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आणि सामाजिक न्याय दिनाच्या औचित्याने पनवेल येथे आयोजित "समता मार्च २०२६" हा उपक्रम यंदाही उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि मोठ्या सहभागासह यशस्वीरित्या पार पडला. मागील चार वर्षांची यशस्वी परंपरा कायम ठेवत, यंदाचा मार्च अधिक व्यापक, प्रभावी आणि आशादायी ठरला.दिनांक २६ जून २०२६ रोजी, कार्यदिवस असूनही सकाळी ७ ते ९ या वेळेत विविध समविचारी संघटना, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. उरण, सायन, अंबरनाथ, मुंबई (सीएसटी), कामोठे, खांदा कॉलनी आणि पनवेल या विविध भागांतून सहभागी झालेल्या नागरिकांमुळे हा मार्च खऱ्या अर्थाने सामूहिक शक्तीचे प्रतीक ठरला.यावर्षीचा मुख्य संकल्प अधिकाधिक समविचारी संघटनांना एकत्र आणण्याचा होता आणि तो यशस्वीरित्या साध्य झाला. विविध संघटनांच्या सहभागामुळे समता, सामाजिक न्याय आणि बंधुभावाचा संदेश समाजाच्या व्यापक स्तरावर प्रभावीपणे पोहोचला. समता मार्चासाठी आवश्यक महानगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या परवानग्या मिळविणे, तसेच संपूर्ण नियोजन, समन्वय आणि पाठपुराव्यासाठी विविध सहभागी संघटनांनी मोलाचे सहकार्य केले. विशेषतः महा. अंनिस पनवेल, संविधान प्रचारक, सत्यशोधक विद्यार्थी संघटना, ग्राम स्वराज समिती महाराष्ट्र, यूथ फॉर्म, धम्मयान संस्था आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळ, खांदा कॉलनी यांच्या सक्रिय




सहभागामुळे हा उपक्रम अधिक सक्षमपणे उभा राहिला.छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून प्रारंभ होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पनवेल मार्केट, बस स्थानकासमोरील सोनबा येलवे पाणपोई, वडाळे तलाव, धूतपापेश्वर कारखाना, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, कृष्णाळे तलाव, संत तुकाराम स्मारक आणि पनवेल बाजार मार्गे पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मार्चचा समारोप करण्यात आला. संपूर्ण मार्गक्रमणादरम्यान जोशपूर्ण घोषणा, प्रेरणादायी गीतं आणि सामाजिक न्यायाचा संदेश सातत्याने घुमत राहिला.महाराष्ट्रात शाहू महाराज जयंतीनिमित्त समता मार्च, मिरवणुका आणि सामाजिक न्याय अधोरेखित करणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्याची परंपरा आहे. या उपक्रमाने त्या परंपरेला अधिक बळकटी दिली.समता मार्चच्या निमित्ताने उपस्थित संस्था व संघटनांनी पनवेलमध्ये "लोकराजा शाहू महाराज चौक" निर्माण करण्याबाबत सरकारकडे मागणी करण्याचा सामूहिक संकल्प व्यक्त केला.तसेच, न्याय, समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांसाठी पुढेही एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार सर्व उपस्थितांनी व्यक्त केला. या उपक्रमासाठी वेळ, श्रम आणि सहकार्य देणाऱ्या सर्व संघटना, कार्यकर्ते आणि सहभागी नागरिकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# पनवेल जिल्हा काँग्रेसतर्फे भारत रक्षक BLA–2 SIR प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** पनवेल जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने भारत रक्षक BLA-2, १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघाचे SIR प्रशिक्षण शिबिर आज आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे उत्साहात पार पडले. पनवेल जिल्हा काँग्रेसच्या नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष डॉ. श्रुती शाम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये प्रमुख मार्गदर्शक व प्रशिक्षक म्हणून ॲड. अरविंद द्विवेदी यांनी उपस्थित सुमारे ५५० BLA-2 कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी BLA-2 ची भूमिका, जबाबदाऱ्या आणि मतदारांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी करावयाच्या कार्याची माहिती दिली. बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये सत्ता मिळविण्याच्या उद्देशाने भाजपने निवडणूक आयोगाला हाताशी धरून लाखो अधिकृत मतदारांची नावे



मतदार यादीतून वगळल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते हनुमंत पवार उपस्थित होते. त्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन करताना, "आपण केवळ काँग्रेस पक्षाचे BLA-



2 नसून देशातील पीडित व सर्वसामान्य नागरिकांच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करणारे खरे भारत रक्षक आहोत," असे प्रतिपादन केले.

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक हरीश केणी यांनी लोकसभा ते नगरपरिषद सभागृहापर्यंत भाजप हुकूमशाही पद्धतीने विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका केली.

जिल्हाध्यक्ष डॉ. श्रुती म्हात्रे यांनी



आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, आंतरराष्ट्रीय पातळीवर पनवेल शहराची वाढत्या लोकसंख्येचे शहर म्हणून ओळख निर्माण होत आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शहर आणि मतदान केंद्रापर्यंत काँग्रेसची विचारधारा पोहोचवून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा कार्याध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानले. तसेच पक्षाच्या पुढील वाटचाली व नियोजनाबाबत काँग्रेस चे जिल्हा प्रवक्ते अजय कापरे यांनी पत्रकारांना माहिती दिली. डॉ. श्रुती म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली "हर घर काँग्रेस" हा अभिनव उपक्रम येत्या काळात राबविण्यात येणार असून, त्याद्वारे गावागावांमध्ये काँग्रेसची विचारधारा व संघटन अधिक बळकट करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी देशातील काँग्रेस संघटनेच्या बळकटीकरणाबाबतही माहिती देण्यात आली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गावापासून ते दिल्लीपर्यंत पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे वक्त्यांनी सांगितले. बूथ स्तरावरील संघटन, युवक व महिला सहभाग, सामाजिक प्रश्नांवरील जनआंदोलने आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी काँग्रेस पक्ष सातत्याने कार्यरत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक ॲड. अरविंद द्विवेदी, पक्ष प्रवक्ते हनुमंत पवार, जिल्हाध्यक्ष डॉ. श्रुती म्हात्रे, नगरसेवक हरीश केणी, नगरसेवक लतिफ शेख, नगरसेवक लीना कातकरी, मा .नगरसेवक रवी म्हात्रे जिल्हा निरीक्षक डॉ. झिशान सिद्दिकी, कार्याध्यक्ष शशिकला सिंग, जिल्हा प्रवक्ते अजय कापरे, उपाध्यक्ष चेतन म्हात्रे, उपाध्यक्ष अमित दवे, शंभू म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. श्रुती म्हात्रे, हरीश केणी, लतिफ शेख, लीना कातकरी, शशिकला सिंग, चेतन म्हात्रे, अमित दवे आणि शंभू म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पत्रकारांना धमक्या देणाऱ्या खा. संजय दिना पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

## निफाड तालुका मराठी पत्रकार संघाचे निफाड पोलीस ठाण्यात निवेदन; पत्रकार संरक्षणाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : राज्यातील पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर तसेच पत्रकारांना धमकावण्याच्या कथित प्रकाराचा निषेध नोंदवत निफाड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने निफाड पोलीस ठाण्यात निवेदन सादर करण्यात आले. शिवसेना (शिंदे गट) चे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना कथितरित्या शिवीगाळ करून असभ्य भाषेचा वापर करत धमकी दिल्याचा आरोप या निवेदनातून करण्यात आला असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्याविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचे



प्रतिनिधित्व करतात. समाजातील विविध प्रश्न जनतेसमोर मांडण्याचे आणि शासन-प्रशासनाला जबाबदार धरण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करत असतात. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींनीच पत्रकारांशी अवमानकारक भाषेत बोलणे किंवा धमकी देणे ही लोकशाही मूल्यांना बाधा आणणारी आणि अत्यंत निंदनीय बाब आहे. अशा घटनांमुळे पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरही त्याचा परिणाम होऊ शकतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या कथित घटनेनंतर राज्यभरातील पत्रकारांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी तसेच पत्रकारांवरील धमक्या व हल्ल्यांच्या घटनांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली.

नाशिक जिल्हा मराठी पत्रकार संघाचे संस्थापक जिल्हाध्यक्ष यशवंतराव पवार यांच्या सूचनेनुसार हे निवेदन निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना देण्यात आले.

यावेळी नाशिक जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब बोरगुडे, निफाड तालुका अध्यक्ष सागर निकाळे, उपाध्यक्ष आशिफभाई पठाण, माणिक देसाई, राहुल कुलकर्णी, विनोद गायकवाड, रवींद्र जाधव, योगेश कर्डीले, अमोल जाधव यांच्यासह पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# शिवसेनेच्या 60 व्या वर्धापनदिनानिमित्त पनवेल दगडी शाळा येथे वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांना छत्री व वह्यावाटप कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : शिवसेनेच्या 60 व्या वर्धापनदिनानिमित्त पनवेल शहर शिवसेनेतर्फे पनवेल म.न.पा. दगडी शाळा क्रं 2 येथे वृक्षारोपण तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोफत छत्री व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना सल्लागार रमेश गुडेकर यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वह्यांचे तर शिवसेना समन्वयक राहुल गोगटे यांच्या माध्यमातून छत्रीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेनेचे राहुल गोगटे यांनी केले होते.

यावेळी शिवसेना जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, नगरसेवक,महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, शहरप्रमुख प्रसाद सोनवणे, शहर संघटक अभिजित साखरे, उपशहर प्रमुख शैलेश जगनाडे, अर्जुन परदेशी, शहर उपसंघटक खंडेश धनावडे,शाखा प्रमुख गुलाब बागवान,विक्रम पाटणकर,जेष्ठ शिवसैनिक सुजन मुसलोंडकर,आयोजक शिवसेना समन्वयक राहुल गोगटे,तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुजित म्हात्रे,शिक्षक वैभव पाटील, वैशाली सावळे, अर्चना माने,स्वाती पाटील आदींचे सहकार्य लाभले.



कार्यक्रमाप्रसंगी बोलताना नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी राहुल गोगटे यांच्या आयोजनाचे कौतुक केले तसेच गोगटे हे कुठल्याही पदाची, नावाची अपेक्षा न ठेवता दरवर्षी हा कार्यक्रम करत असतात, त्यामुळे निश्चितच गरजू विद्यार्थ्यांना याचा लाभ होतो, शिवसेनेच्या 80% समाजकारण 20% राजकारण या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तसेच पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अपेक्षित कार्य या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.यावेळी बोलताना शिवसेना जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर व शिक्षकवृंद यांनी देखील राहुल गोगटे यांच्या कामाचे कौतुक करून यापुढे देखील असेच सहकार्य शाळेस करण्याचे आवाहन केले.

# तळागाळातील पत्रकार आणि समाजसेवकांच्या योगदानाचा गौरव; ‘आर्यारवी एंटरटेनमेंट’ चा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी-केतन भोज)** : "समाजाचा आरसा असणाऱ्या आणि कोणत्याही परिस्थितीत सत्याची बाजू मांडणाऱ्या तळागाळातील पत्रकारांच्या, समाजसेवकांच्या आणि कलावंतांच्या अविरत कष्टांचा सन्मान आता मुंबईत होणार आहे. अभिनय, दिग्दर्शन आणि पत्रकारिता क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे महेश्वर भिकाजी तेटांबे यांच्या संकल्पनेतून, ‘आर्यारवी एंटरटेनमेंट’ तर्फे रविवार, दिनांक १२ जुलै रोजी एका भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य प्रवाहातील माध्यमांसोबतच ग्रामीण भागातील मुक्त वार्ताहर, साप्ताहिक-पाक्षिकांचे प्रतिनिधी आणि डिजिटल न्यूज पोर्टलच्या संपादकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा हा कौतुकास्पद सोहळा ठरणार आहे. या सोहळ्यात पत्रकारितेतील निष्ठा, निर्भीडपणा आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या लढवय्या लेखणीचा सन्मान करण्यासाठी विविध मानाचे पुरस्कार प्रदान केले जातील. त्यात प्रामुख्याने 'स्वाभिमान लेखणी', 'शब्दवेध गौरव', 'अजेय लेखणी', 'कलम-रत्न', 'कलागौरव', 'साहित्य-संस्कृती जीवनगौरव', 'विवेक-दीप', 'जनसेवा रक्षक' आणि निर्भीड पत्रकारिता पुरस्कार इत्यादी पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या सोहळ्याला कला, साहित्य आणि पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गज हजेरी लावणार आहेत. यामध्ये जगप्रसिद्ध बोलके बाहुलाकार आणि जादूगार श्री. श्रीधर कीर, "कुटुंब रंगलंय काव्यात" फेम प्रा.विसुभाऊ बापट, प्रसिद्ध कवी आणि साहित्यिक श्री.अरुण म्हात्रे, साहित्याचार्य आणि ज्येष्ठ संपादक श्री. पंढरीनाथ तामोरे, ज्येष्ठ पत्रकार श्री.गुरुनाथ तिरपणकर, श्री. अड.सुनिल शिर्के आणि समाजसेवक श्री. कृष्णा बाळू काजरोळकर या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण केले जाईल.

"लेखणीच्या या पवित्र उत्सवाचा हा दिमाखदार सोहळा रविवार, दिनांक १२ जुलै २०२६ रोजी, सकाळी ठीक ९:३० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत, सुरेंद्र गावस्कर हॉल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर (पूर्व) येथे संपन्न होणार आहे.

तरी या सोहळ्याला रसिकांनी आणि पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन पत्रकार राहुल खरात आणि केतन भोज यांनी आयोजकांतर्फे केले आहे.

# केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवलेंकडून अक्षय ( बंटी ) दिलीप घोडेस्वार कुटुंबियांचे सांत्वन

**दैनिक युवक आधार**

**जामखेड प्रतिनिधी बापुसाहेब घोडेस्वार :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मुंबई लाल डोंगरचे जेष्ठ कार्यकर्ते दिलीप एकनाथ घोडेस्वार यांचे चिरंजीव दिवंगत बुद्धवाशी अक्षय घोडेस्वार यांचे दि १६ रोजी निधन झाले. या पार्श्वभूमीवर रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी शनिवार दि २० रोजी सायंकाळी ९ वाजता बुद्धवाशी अक्षय दिलीप घोडेस्वार यांच्या अशापुरा बिल्डिंग B विंग 5th फ्लॉवर लाल डोंगर ST रोड चेंबूर मुंबई लाल डोंगर येथील निवासस्थानी




भेट घेऊन घोडेस्वार परिवाराचे सांत्वन केले. तसेच बुद्धवाशी अक्षय घोडेस्वार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

बुद्धवाशी अक्षय घोडेस्वार वय (३०) यांचे दि. १६ जून २०२६ रोजी मुंबई सायन हॉस्पिटल मध्ये दुखत निधन झाले लालडोंगर चेंबूर चारई स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. घोडेस्वार परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला.यावेळी रिपाई मुंबई प्रदेश संघटक रमेश घोक्षे, रिपाई चेंबूर तालुका अध्यक्ष रवी गायकवाड, रिपाई १५५ वॉर्ड अध्यक्ष दिलीप लागडे, पनवेल (सुकापूर ) माझी ग्रामपंचायत सदस्य - प्रज्ञा अभिषेक घोडेस्वार तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

अक्षय उर्फ बंटी घोडेस्वार त्यांच्या पाठीमागे पत्नी, मुलगी, आई, वडील, भाऊ, वाहिनी, बहिणी, चुलते, चुलती, चुलत भाऊ, चुलत बहीण, आत्या असा मोठा परिवार आहे.

# ज्ञानविकास विद्यालयात पल्स पोलिओबाबत जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : येथील ज्ञानविकास विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'नॅशनल पल्स पोलिओ डे'निमित्त रांगोळी, घोषवाक्ये आणि पोस्टर प्रदर्शनाच्या माध्यमातून पल्स पोलिओ मोहिमेबाबत प्रभावी जनजागृती केली.देशभरात राबविण्यात येत असलेल्या पल्स पोलिओ मोहिमेच्या पार्श्वभूमीवर, शून्य ते पाच वयोगटातील बालकांना पोलिओचा डोस देणे किती आवश्यक आहे, याचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. "दोन थेंब आरोग्याची" या मोहिमेद्वारे भविष्यात बालकांना




दिव्यांगत्वापासून वाचविण्यासाठी प्रतिबंधात्मक डोस देण्याचे आवाहन विद्यार्थ्यांनी केले. पोलिओमुळे येणारे दिव्यांगत्व हे उपचारातीत असते, त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून डोस देणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.या उपक्रमात शाळेतील श्रावणी बिडवे, श्रावणी बनकर, वेदिका गायके, तनवी बनकर, मानसी शिंदे, साक्षी भिवसने, सोनाली सोन्ने, समृद्धी, सिद्धी माचवे, सृष्टी दौड, वेदिका चाथे आणि फातिमा पटेल या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. त्यांना गायकवाड शिवाजी, वंदना पालकर, सुनीता काकडे आणि पूजा नेवगे यांचे मार्गदर्शन लाभले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ठाणे पोलीस आयुक्तालयाची धडक कारवाई

## तब्बल ३९ कोटींचा ६०० किलो अंमली पदार्थांचा साठा जप्त करून केला नष्ट!

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** संपूर्ण देशभरात अमली पदार्थांच्या विळख्यातून तरुण पिढीला वाचवण्यासाठी 'नशामुक्त भारत अभियान' अत्यंत प्रभावीपणे राबवले जात आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून, जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून ठाणे पोलीस आयुक्तालयाने ड्रग्ज माफियांच्या विरोधात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई केली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये वेगवेगळया कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला तब्बल ३९ कोटी ३ लाख ४८ हजार ४०० रुपये किमतीचा आणि सुमारे ६०० किलो वजनाचा अंमली पदार्थांचा प्रचंड साठा पोलिसांनी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून पूर्णपणे नष्ट केला आहे. ठाणे शहराचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या थेट आदेशानंतर ही मोठी मोहीम राबवून सर्व अंमली पदार्थ नवी मुंबईतील तळोजा एम.आय.डी.सी. येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीत नेऊन शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आले, ज्यामुळे अमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

केंद्र सरकारच्या कायदेशीर निर्देशानुसार आणि अंमली पदार्थ विरोधी मोहिमेला गती देण्यासाठी ठाणे पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे . २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ दिनाचे औचित्य साधून केंद्रीय मुद्देमाल नाश समितीचे अध्यक्ष तथा पोलीस सह आयुक्त (गुन्हे) डॉ. पंजाबराव उगले, समितीचे सदस्य तथा पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय १) मीना मकवाना आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विनय घोरपडे यांच्या मुख्य उपस्थितीत ही नष्टीकरण मोहीम पार पडली. ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत दाखल असलेल्या एकूण ११२ गंभीर गुन्ह्यांमध्ये हा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे व त्यांच्या विशेष पथकाने सर्व आवश्यक त्या कायदेशीर सोपस्कार आणि तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून या कोट्यवधींच्या ड्रग्जची होळी केली. या धडक कारवाईत नष्ट करण्यात आलेल्या अंमली पदार्थांच्या अचूक आकडेवारीवर नजर टाकल्यास पोलिसांच्या कामगिरीची व्याप्ती स्पष्ट होते. पोलिसांनी ६६ गुन्ह्यांशी




संबंधित ५६४ किलो ६७४ ग्रॅम वजनाचा गांजा नष्ट केला, ज्याची बाजारभावाप्रमाणे किंमत १ कोटी १३ लाख ५ हजार रुपये होती. तसेच केवळ २ गुन्ह्यांमध्ये जप्त केलेला ८५ लाख ५० हजार रुपयांचा ८५५ ग्रॅम वजनाचा अत्यंत महागडा हायब्रिड गांजाही खाक करण्यात आला. सर्वात मोठी कारवाई एम.डी. (मेफेड्रोन) या जीवघेण्या अंमली पदार्थावर झाली, ज्यामध्ये २९ गुन्ह्यांतर्गत जप्त केलेले १३ कोटी ४३ लाख रुपये किमतीचे ६ किलो ७१५ ग्रॅम एम.डी. नष्ट करण्यात आले. याशिवाय ७ गुन्ह्यांमधील २० कोटी ९८ लाख २० हजार रुपये मूल्य असलेले २० किलो ९८२ ग्रॅम चरस, ७ गुन्ह्यांमधील २ लाख ९३ हजार ४०० रुपये किमतीच्या १४६७ कफ सिरपच्या बॉटल्स आणि १ गुन्ह्यातील २० लाख ८० हजार रुपयांची १०४ ग्रॅम ब्राउन शुगर अशा प्रकारे एकूण ५९४ किलो ३३२ ग्रॅम वजनाचा ठोस साठा आणि १४६७ कफ सिरपच्या बाटल्या असा एकूण ३९ कोटींपेक्षा जास्त रुपयांचा मुद्देमाल एकाच वेळी नष्ट करण्यात आला आहे.

ही अत्यंत संवेदनशील आणि मोठी कामगिरी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या थेट मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पूर्ण झाली. या मोहिमेत अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्यासह परिमंडळीय नोडल अधिकारी आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील, चंद्रहास गोडसे, जयपाल राजपूत, संदीप धांडे, संजय दवणे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कर्णवर-पाटील, पोलीस उपनिरीक्षक दीपक डुम्मलवाड, राजेंद्र निकम, मोहन परब आणि सहाय्यक रासायनिक विश्लेषक यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यासोबतच पोलीस हवालदार हरीश तावडे, अभिजीत मोरे, अमोल पवार, संदीप चव्हाण, नंदकिशोर सोनगिरे, हुसेन तडवी, अमोल देसाई, अमित सकपाळ, अजय सकपाळ, गिरीश पाटील, अनुप राक्षे, शिल्पा कसबे आणि कोमल लादे यांच्यासह संपूर्ण पोलीस पथकाच्या अहोरात्र मेहनतीमुळे ही यशस्वी जप्ती व विल्हेवाटीची कारवाई पूर्ण झाली असून, ठाणे पोलिसांनी नशामुक्त समाजासाठी आपला निर्धार पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

---

## जेष्ठ समाजसेवक माधवराव पाटील हडसणीकर काळाच्या पडद्याआड

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूर नांदेड प्रतिनिधी/सय्यद इसा :** माहूर तालुक्यातील हडसणी येथील सुप्रसिद्ध समाजसेवक माधवराव परसराम जाधव पाटील हडसनिकर वय 84 वर्ष यांचे वृद्धापकाळाने दि 26 रोजी सकाळी 8 वाजून 15 मिनिटांनी राहत्या घरी निधन झाले .



माधवराव पाटील हडसनीकर हे किनवट पंचायत समिती असताना त्यांनी सभापती पद भूषविले तर दोन वेळा मौजे हडसनी गावचे सरपंच पद ही भूषविलेले आहे समाजसेवेतील प्रत्येक कार्यात अग्रेसर राहत असल्याने त्यांचा मोठा चाहता वर्ग निर्माण झालेला होता

त्यांचे वर मौजे हडसनी येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली त्यांचे पश्चात पत्नी एक मुलगा एक मुलगी सुन नातवंडे असा परिवारआहे.

---

## पत्रकारांचा अपमान सहन केला जाणार नाही; खासदार संजय दिना पाटील यांच्या कथित वक्तव्याविरोधात मुख्यमंत्रींकडे कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूरगड नांदेड प्रतिनिधी/सय्यद इसा :** माहूर येथे निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटना आणि निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांबाबत कथितरीत्या केलेल्या आक्षेपार्ह, अवमानकारक व शिवीगाळयुक्त वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

यासंदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना, मार्फत पोलीस निरीक्षक, माहूर पोलीस स्टेशन, निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्यांच्याविषयी अशा प्रकारची भाषा वापरणे अत्यंत निषेधार्ह असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

संघटनेने संबंधित प्रकरणाची तातडीने निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली असून, चौकशीत आरोप सिद्ध झाल्यास संबंधित खासदारावर प्रचलित कायद्यानुसार योग्य ती शिस्तभंगाची व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पत्रकारांच्या सन्मान, सुरक्षितता व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना करण्याचीही विनंती करण्यात आली आहे.




**प्रमुख मागण्या**

संबंधित प्रकरणाची तात्काळ व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.आरोप सिद्ध झाल्यास कायद्यानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी.पत्रकारांच्या सन्मान, सुरक्षितता व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात याव्यात.

या निवेदनावर श्री. कुंदन सुभाष तिवडकर (शहराध्यक्ष तथा निर्भय समाज कार्य तालुका अध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली तालुका उपाध्यक्ष समाधान कांबळे, युवा तालुका अध्यक्ष आदेश बेहरे, संजय वडस्कर, गोपाल चव्हाण आणि अंबादास मुकटे पाठिंबा दर्शविला.

---

## पत्रकारांना शिवीगाळ व धमकी प्रकरणी खा.संजय दिना पाटील यांच्या वर गुन्हा दाखल करा

### अन्यथा देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन :– हमीदखान पठाण

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी कथितरित्या अशोभनीय व अपमानास्पद भाषेत संवाद साधत शिवीगाळ व धमकी दिल्याच्या प्रकाराचा मराठी पत्रकार परिषद, तालुका शाखा ता.पाटोदा यांच्या वतीने तिव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी खासदारांनी सार्वजनिक माफी मागितली असली तरी केवळ माफी पुरेशी नसून खासदार संजय दिना पाटील यांच्या विरुद्धात तात्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मराठी पत्रकार परिषद, तालुका शाखा पाटोदा चे सचिव हमीदखान पठाण यांनी केली आहे. या संदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे



की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून जनतेचा आवाज प्रशासन व शासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करीत असतात. अशा पत्रकारांना धमकावणे, त्यांच्याशी अपमानास्पद भाषा वापरणे अथवा त्यांच्या वर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे लोकशाही मूल्यांवर तसेच पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर थेट आघात करणारे आहे.

मराठी पत्रकार परिषद पाटोदा यांनी या घटनेची गंभीर दखल घेत संबंधितांवर शिवीगाळ, धमकी देणे तसेच इतर लागू असलेल्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. या बाबत तातडीने कारवाई न झाल्यास जिल्हाभर तसेच राज्यभर मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तिव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ही मराठी पत्रकार परिषद पाटोद्याच्या वतीने हमीदखान पठाण यांनी दिला आहे.

---

## मुरूड पोलिसांची कारवाई; अवैध देशी दारूसह १.३४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी :** मुरूड पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध दारू वाहतूक आणि विक्रीविरोधात कारवाई करत दोन जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत देशी दारूचा मोठा साठा आणि एक चारचाकी वाहन असा एकूण १ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार (दि. २६ जून) सकाळी सुमारे ९.२० वाजण्याच्या सुमारास अंकोली परिसरात कारवाई करण्यात आली. यावेळी मारुती सुझुकी आल्टो (क्र. MH-24 C-7954) या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ९० मिली क्षमतेच्या 'सिमला संत्रा' व 'टँगो पंच' ब्रँडच्या देशी दारूच्या एकूण १,६००




सीलबंद प्लास्टिक बाटल्या आढळून आल्या. जप्त दारूची किंमत ६४ हजार रुपये, तर वाहनाची अंदाजित किंमत ७० हजार रुपये असून एकूण १ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी महेश लक्ष्मण गायकवाड (वय २४, रा. खंडापूर, ता. जि. लातूर) आणि महादेव शंकर गायकवाड (वय ४२, रा. खंडापूर, ता. जि. लातूर) यांच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक १९५/२०२६ नोंद करण्यात आला आहे. त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(अ), ६५(ई), ८१ व ८३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक रामदास बलभीम नाडे यांनी फिर्याद दिली असून, गुन्ह्याची नोंद पोलीस हवालदार काळगे यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार माने करीत आहेत.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, आरोपींकडे संबंधित दारूसाठा कोणताही वैध परवाना किंवा पास नसताना चोरट्या विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याचा संशय आहे.

याप्रकरणी अधिक तपास सुरू असून, या अवैध दारू पुरवठ्यामागील साखळीचा शोध घेण्याचे काम मुरूड पोलीस करीत आहेत.

---

## विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिकांनाही दिलासा; सुडकोली, महाजने मार्गावर लालपरीची पुन्हा धाव

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रेवदंडा बसस्थानकातून सुडकोली, भोनंग आणि महाजने या दुर्गम ग्रामीण भागांसाठी चालणाऱ्या एसटीच्या (लालपरी) फेऱ्या बंद झाल्याने गेल्या काही महिन्यांपासून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत होते. मात्र आता सुडकोली मार्गावरील फेरी पूर्ववत सुरू झाल्याने आणि महाजने मार्गावरील सेवा बेलोशी हायस्कूलपर्यंत सुरू करण्यात आल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.गतवर्षी डिसेंबर महिन्यापासून या तीनही मार्गांवर रस्त्यांच्या दुरुस्ती व बांधकामाची कामे सुरू झाली होती. त्यामुळे रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाल्याने एसटी वाहतूक बंद करण्यात आली होती. परिणामी, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. अनेक पालकांना यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागला, तर विद्यार्थ्यांनाही रोजच्या प्रवासात अडचणींचा सामना करावा लागला.दरम्यान, १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाल्यानंतर रामवाडी-पेण विभागीय नियंत्रक कार्यालयाने संबंधित मार्गांची पाहणी केली. त्यानंतर सुडकोली मार्गावरील एसटी सेवा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच महाजने मार्गावरील बससेवा सध्या बेलोशी हायस्कूलपर्यंत मर्यादित स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. मात्र भोनंग मार्गावरील रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण असल्याने त्या मार्गावर लालपरीची सेवा सुरू करण्यात आलेली नाही, अशी माहिती रेवदंडा बसस्थानकातील वाहतूक



नियंत्रक कक्षाकडून देण्यात आली.या तीनही भागांतील अनेक विद्यार्थी रेवदंडा येथे उच्च माध्यमिक शिक्षणासाठी दररोज प्रवास करतात. एसटी सेवा बंद असल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली होती. आता लालपरी पुन्हा रस्त्यावर धावू लागल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांनाही या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. बँकेची कामे, शासकीय कार्यालयातील व्यवहार, दवाखान्यातील उपचार, बाजारपेठेतील खरेदी-विक्री आणि इतर दैनंदिन गरजांसाठी या भागातील नागरिक मोठ्या प्रमाणावर एसटी सेवेवर अवलंबून असतात. एसटी बंद असल्याने अनेक ज्येष्ठ नागरिकांना खासगी वाहनांचा खर्च परवडत नव्हता. त्यामुळे त्यांची गैरसोय होत होती. आता लालपरी पुन्हा सुरू झाल्याने त्यांच्या प्रवासाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला आहे.मात्र भोनंग मार्गावरील सेवा अद्याप बंद असल्याने तेथील विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून त्या मार्गावरही एसटी सेवा सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. ग्रामीण भागाच्या जीवनवाहिनी मानली जाणारी लालपरी पुन्हा धावू लागल्याने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले आहे.

---

## वांगण सुळे येथिल एकता शेतकरी गटास प्रकल्पांतर्गत भात बियाणे वाटप

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** वांगण सुळे गावातील एकता शेतकरी गट यांनी दिनांक 26 जून 2026 रोजी रत्नागिरी भाताचे वाण प्रकल्पांतर्गत बियाणे वाटप कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

या उपक्रमासाठी सुरगाणा कृषी विभागाचे सहकार्य लाभले असून गटाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

कार्यक्रमाला सहाय्यक कृषी अधिकारी सौ. हेमलता गायकवाड मॅडम यांनी आवर्जून उपस्थिती दर्शवली. त्यांनी शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया तंत्राविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच नैसर्गिक



शेतीसाठी उपयुक्त असलेल्या दशपर्णी अर्काचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतीने बीज वापरण्याचे ज्ञान मिळाले आणि नैसर्गिक उपायांचा अवलंब करण्याची प्रेरणा मिळाली.

गटातील सर्व सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न केले.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक वाण उपलब्ध झाले, नैसर्गिक शेतीसाठी उपयुक्त उपायांची माहिती मिळाली आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेला बळकटी मिळाली.

# रहदारीच्या रस्त्यावर रेतीचा ढीग; वाहतुकीस अडथळा, नागरिकांत संताप

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** लाखनी नगरपंचायतच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये सुरू असलेल्या नाली बांधकामासाठी आणलेली रेती गेल्या चार दिवसांपासून थेट रहदारीच्या रस्त्यावर टाकून ठेवण्यात आली आहे. त्यामुळे वाहनचालक, पादचारी आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यावर रेतीचा ढीग असल्यामुळे किरकोळ अपघाताचीही घटना घडली आहे. तरीही संबंधित ठेकेदार किंवा नगरपंचायत प्रशासनाने रेती हटविण्याबाबत कोणतीही तत्परता दाखवलेली नाही. चार दिवसांपासून ही परिस्थिती कायम असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



नागरिकांनी प्रभागातील नगरसेवकांनी स्वतः जातीने लक्ष घालून रस्त्यावरची रेती तात्काळ हटवावी, तसेच बांधकाम साहित्य रस्त्यावर न ठेवता सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा मोठा अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित ठेकेदार व नगरपंचायत प्रशासनावर राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# डोंगरगाव जिल्हा परिषद मॉडेल स्कूलचा राज्यस्तरावर गौरव; 'हा शिक्षणाचा पॅटर्न महाराष्ट्रासाठी आदर्श' – नितीन लालसरे

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील डोंगरगाव जिल्हा परिषद मॉडेल स्कूलने ग्रामीण शिक्षणात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी नितीन लालसरे यांनी शाळेला सदिच्छा भेट देत विविध उपक्रमांची पाहणी केली. यावेळी त्यांनी, "डोंगरगाव जिल्हा परिषद मॉडेल स्कूलने उभारलेला शिक्षणाचा पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रासाठी आदर्श ठरेल," असे गौरवोद्गार काढले.

भेटीदरम्यान विद्यार्थिनी खुशी व ईश्वरी यांनी फ्रेंच, चायनीज, इटालियन आणि स्पॅनिश या परदेशी भाषांमध्ये त्यांचे स्वागत केले. तसेच विद्यार्थी सहकारी बँकेच्या बाल व्यवस्थापकांनी बँकेच्या कामकाजाची माहिती



सादर केली. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रम पाहून लालसरे यांनी समाधान व्यक्त केले.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी स्वतःचा प्रेरणादायी जीवनप्रवास उलगडला. दहावीत इंग्रजी विषयात अपयश आल्यानंतरही जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवत इंग्रजीचे प्राध्यापक झालो. त्याच इंग्रजीवरील प्रभुत्वामुळे मुख्यमंत्री कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळाली, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी इंग्रजी आणि आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून मोठी स्वप्ने पाहावीत, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी त्यांनी त्यांच्या कन्या 'राहा'च्या नावाने स्थापन केलेल्या राहा लालसरे फाउंडेशनच्या माध्यमातून शाळेला आवश्यक शैक्षणिक साहित्य व विकासकामांसाठी मदत देण्याची घोषणा केली. तसेच शाळेच्या विविध प्रलंबित मागण्या शासन स्तरावर मांडून त्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

या भेटीमुळे डोंगरगाव जिल्हा परिषद मॉडेल स्कूलच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना राज्यस्तरावर नवी ओळख मिळाली असून, ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे. शाळेच्या या यशाबद्दल शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी एरंडोल चा "शंभर टक्के निकाल, गुणवत्तेचा कमाल!

**दैनिक युवक आधार**

**एरंडोल प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या उन्हाळी २०२६ डी. फार्मसी परीक्षेत शास्त्री फाऊंडेशन संचालित शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, एरंडोल ने पुन्हा एकदा १००% निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.




प्रथम वर्ष डी. फार्मसीमध्ये कु. मोनाली मराठे हिने ७६.७०% गुणासह प्रथम, मच्छिंद्र पाटील यांनी ७०.५०% गुणांसह द्वितीय, तर कु. ऋतिका चौधरी हिने ६९.८०% गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

अंतिम वर्ष डी. फार्मसीमध्ये कु. कांचन माळी हिने ७७.६४% गुणांसह प्रथम, महेंद्र पाटील यांनी ७७.३६% गुणांसह द्वितीय, तर जगदीश पाटील यांनी ७६.०९% गुणांसह तृतीय क्रमांक पटकाविला.

संस्थेचा सलग १०० टक्के निकाल, विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण ही महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई कडून अति उत्तम मानांकन प्राप्त शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीची ओळख बनली आहे. परिसरातील विद्यार्थिनी शासकीय (लाडकी बहीण योजनेचा) शिष्यवृत्तीचा पुरेपूर फायदा घेत मोफत शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य डॉ. विजय शास्त्री, संस्थेच्या सचिव सौ. रूपा शास्त्री आणि उपप्राचार्य डॉ. पराग कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे तसेच अथक परिश्रम घेणाऱ्या सर्व प्राध्यापकांचे अभिनंदन केले. भविष्यातही गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्कृष्ट निकाल आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून संस्था यशाची परंपरा अधिक बळकट करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला."औषधनिर्मितीच्या वाटेवर, शंभर टक्के यशाची खात्री!" असणारे एकमेव कॉलेज म्हणजे शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी एरंडोल यांनी गुणवत्तेवर भर देऊन यशाची परंपरा कायम राखली.यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मेरा युवा भारत' हिंगोली तर्फे अमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅली संपन्न; युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**विजय खुडे जिल्हा प्रतिनिधी हिंगोली :** हिंगोली -तरुणाईला अमली पदार्थांच्या (ड्रग्ज) विळख्यातून वाचवण्यासाठी आणि व्यसनमुक्तीचा संदेश देण्यासाठी 'मेरा युवा भारत' (MY Bharat) हिंगोली वतीने शहरात एका भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये शेकडो युवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत 'व्यसन नको, जीवन हवे' असा संदेश दिला.



**रॅलीचा मार्ग आणि घोषणाबाजी**

स्थानिक प्रमुख मार्गावरून काढण्यात आलेल्या या रॅलीची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली. रॅलीदरम्यान "अमली पदार्थ देशोधडीचे कारण, त्याचे करा पूर्ण निवारण", "व्यसनाला म्हणा नाही, आरोग्याला म्हणा होय" अशा घोषणांनी शहर दणाणून सोडले होते. तरुणांच्या हातातील फलक (प्लेकार्ड्स) नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत होते.

**मान्यवरांचे मार्गदर्शन**

रॅलीच्या सांगता समारंभाप्रसंगी मेरा युवा भारत हिंगोली चे प्रणित सांगवीकर व अनिल ढेंगे उपस्थित मार्गदर्शकांनी युवकांशी संवाद साधला.

"आजची युवा पिढी देशाचे भविष्य आहे. मात्र, अमली पदार्थांचे व्यसन या भविष्याला पोखरत आहे. 'मेरा युवा भारत' या व्यासपीठाच्या माध्यमातून तरुणांना आरोग्याचे आणि आत्मनिर्भरतेचे महत्त्व पटवून देणे हाच या रॅलीचा मुख्य उद्देश आहे," असे मत वक्त्यांनी व्यक्त केले.

**व्यसनमुक्तीची शपथ**

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना अमली पदार्थांच्या सेवनापासून दूर राहण्याची आणि आपल्या परिसरात व्यसनमुक्तीसाठी कार्य करण्याची सामूहिक शपथ देण्यात आली. रॅली यशस्वी करण्यासाठी 'मेरा युवा भारत'चे समन्वयक, स्वयंसेवक, विविध महाविद्यालयांचे चे विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# सोयगावातील गौण खनिज उत्खनन प्रकरणाची सखोल चौकशी होणार

## दोषींवर कठोर कारवाईचे प्रशासनाकडून आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सोयगाव शहरात व तालुक्यातील विविध गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतातून करण्यात आलेल्या गौण खनिज उत्खनन व धरण प्रकल्पांच्या कामांबाबत गंभीर तक्रारी समोर आल्यानंतर मराठा मावळा संघटना महाराष्ट्रच्या वतीने प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात आले. जिल्हाधिकारी यांच्या अनुपस्थितीत निवेदन स्वीकारलेल्या अप्पर जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत



सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.मराठा मावळा संघटनेचे तालुकाध्यक्ष विशाल बिदवाल यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने प्रशासनाची भेट घेतली.यावेळी शेतकऱ्यांच्या शेतातून मोठ्या प्रमाणावर मुरूम, माती व इतर गौण खनिजांचे उत्खनन करण्यात आल्याच्या तक्रारी तसेच त्यामुळे झालेल्या नुकसानीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.निवेदनामध्ये उत्खननासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या होत्या का, संबंधित शेतकऱ्यांची संमती होती का, तसेच नियमांनुसार काम झाले का याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनींचे स्वरूप बदलल्याच्या तक्रारी असून त्याबाबत महसूल, खनिकर्म व संबंधित विभागामार्फत संयुक्त पंचनामा करण्याची मागणीही करण्यात आली आहे.यावर अप्पर जिल्हाधिकारी यांनी शिष्टमंडळाशी सकारात्मक चर्चा करत प्रकरणाची सर्वंकष चौकशी करण्यात येईल तसेच नियमबाह्य उत्खनन, शेतकऱ्यांच्या हक्कांचे उल्लंघन अथवा कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार आढळल्यास संबंधित अधिकारी, ठेकेदार व जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

मराठा मावळा संघटनेने प्रशासनाच्या आश्वासनाचे स्वागत केले असून चौकशीची प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष पद्धतीने राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा व झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी, अशी मागणी पुन्हा करण्यात आली आहे.

# स्व. देवराव दिगांबर वराट कॉलेज ऑफ फार्मसी साकत डी फार्मसी विद्यार्थ्यांचे परीक्षेत घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**

**जामखेड प्रतिनिधी बापुसाहेब घोडेस्वार :** निसर्गरम्य वातावरणात शांततेत असणारे साकत येथे स्व. देवराव दिगांबर वराट कॉलेज ऑफ फार्मसी साकत डी फार्मसी कॉलेज. साकतचे भूमिपुत्र असणारे प्रा. अरुण वराट सर व त्यांचे बंधू कृषी बाजार समितीचे माजी उपसभापती कैलास वराट सर यांनी कॉलेजची स्थापना केली.

गोरगरीब तसेच शेतकरी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी स्व. देवराव दिगंबर वराट कॉलेज ऑफ फार्मसी व डी फार्मसी कॉलेजची स्थापना केली.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ २०२६ च्या परीक्षेत महाविद्यालयाने प्रथम वर्षाच्या शंभर टक्के तर द्वितीय वर्षात ९८ टक्के निकालाची परंपरास्व. देवराव दिगांबर वराट कॉलेज ऑफ फार्मसी व डी फार्मसी कॉलेजने कायम ठेवली आहे.

प्रथम वर्षात प्रथम क्रमांक- शुभांगी भोसले ७३. ९० टक्के, द्वितीय क्रमांक- मिथाली आगे ७३. ६० टक्के, तृतीय क्रमांक अनुष्का बोडके ७१. ९०टक्के, सिमरण शेख ७१. ३० टक्के, सतीश चव्हाण ७१. १० गुण मिळवले आहेत.




द्वितीय वर्षात प्रथम क्रमांक सुशेन कोठुळे ७८. ३६ टक्के, द्वितीय क्रमांक सोनाली निकम ७४. ७३ टक्के, सुषमा सपकाळ ७३ टक्के, सलमान पठाण ७२. ९१ टक्के तर उज्वला टेकाळे ७२. ०९ टक्के असे गुण मिळवले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. अरुण वराट, सचिव कैलास वराट, प्राचार्य गोरक्ष बारगजे यांच्यासह सर्व संचालक व शिक्षक तसेच कर्मचारी यांचे अभिनंदन केले जात आहे

# खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :** अमरावती लोकसभेचे खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रस्ता सुरक्षा जनजागृतीचा संदेश देण्याच्या उद्देशाने प्रत्येक रक्तदात्यास हेल्मेट भेट देण्यात येणार आहे.

हे रक्तदान शिबिर दि. २ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत कृषी भवन, दर्यापूर येथे आयोजित करण्यात आले आहे. "रक्तदानाने वाचेल रुग्णाचा जीव, हेल्मेटने वाचेल स्वतःचा जीव" हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.



या उपक्रमाचे आयोजन खासदार बळवंतभाऊ वानखडे मित्र परिवार यांच्या वतीने करण्यात आले असून परिसरातील युवक, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक व रक्तदाते यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळणार असून हेल्मेट भेटीमुळे सुरक्षित वाहन चालविण्याबाबत जनजागृती होण्यास मदत होणार आहे.

त्यामुळे या सामाजिक उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# आमदार अमरभाऊ राजुरकर यांची तिसऱ्यांदा विधान परिषदेत निवड; शुभेच्छा देत अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी योगेश चौदंते :** विधान परिषदेच्या निवडणुकीत आमदार मा. श्री. अमरभाऊ राजुरकर हे तिसऱ्यांदा प्रचंड मताधिक्याने विजयी होऊन विधान परिषदेवर निवडून आल्याबद्दल त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पुष्पगुच्छ देत मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.यावेळी त्यांच्या आगामी राजकीय, सामाजिक



व लोकहिताच्या कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. राज्याच्या विकासासाठी तसेच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर ते अधिक प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या प्रसंगी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस संतोष पाटील गाडे पांगरगावकर, नगरसेवक संजय सोनटक्के, प्रतिनिधी बालाजी गवडकर व लेंडेवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी आमदार अमरभाऊ राजुरकर यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पद्मश्री पुरस्कृत मान्यवरांचा नागरी सत्कार आज

## विद्यापीठाच्या वतीने डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात आयोजन

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने पद्मश्री पुरस्कृत मान्यवरांचा नागरी सत्कार समारंभ सिव्हिल लाईन परिसरातील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची तर मुख्य अतिथी म्हणून भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश श्री. भूषण रामकृष्ण गवई यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर भूषविणार आहे. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. अखिलेश पेशवे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्यासह सत्कार समिती अध्यक्ष तथा अधिसभा सदस्य ॲड. मनमोहन बाजपेयी यांची उपस्थिती राहणार आहे. या सत्कार सोहळ्यात ८ मार्च २०२५ रोजी झालेल्या अधिसभा बैठकीत पारित प्रस्तावाच्या अनुषंगाने गठीत समितीने घेतलेल्या निर्णयानुसार मागील पाच वर्षातील (वर्ष २०१९ नंतर) पद्मश्री पुरस्कार प्राप्त पद्मश्री श्री. शंकर बाबा पापळकर, पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ. स्मिता कोल्हे, पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, पद्मश्री श्री. नामदेवराव कांबळे पद्मश्री डॉ. धनंजय सगदेव, पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, पद्मश्री डॉ. विलास डांगरे, पद्मश्री श्री. सत्यनारायण नुवाल, पद्मश्री श्री. जनार्दनपंत बोथे आदी मान्यवरांचा सत्कार केला जाणार आहे. अधिसभेने पारित केलेल्या प्रस्तावानुसार समितीचे अध्यक्ष म्हणून ॲड. मनमोहन बाजपेयी यांनी तर सदस्य म्हणून डॉ. राजेश भोयर, डॉ. अजय अग्रवाल, डॉ. देवेंद्र भोंगाडे, डॉ. योगेश भुते, डॉ. अजय चव्हाण, डॉ. श्रीकांत भोवते, डॉ. चंदू पोपटकर, श्री. विष्णू चांगदे, श्री. दिनेश शेराम, श्री. सुनिल फुडके, श्री. राहुल हनवते यांनी कार्य केले. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. राजू हिवसे व सत्कार समिती अध्यक्ष ॲड. मनमोहन बाजपेयी यांनी केले आहे.

**पद्मश्री श्री शंकर बाबा पापळकर**

अमरावती जिल्ह्याच्या अचलपूर तालुक्यातील वझ्झर येथे स्व. श्री अंबादासपंत वैद्य दिव्यांग, बेवारस बालगृहाच्या माध्यमातून पद्मश्री श्री. शंकर बाबा पापळकर यांनी अनेक रस्त्याच्या कडेला सोडून दिलेल्या बेवारस दिव्यांग मुलांना पितृछत्र देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्यभर संघर्ष केला आहे. कुटुंबाने नाकारलेल्या दिव्यांग मुला-मुलींना आपल्या पितृछत्राखाली श्री. शंकर बाबा पापळकर यांनी केवळ त्यांना वाढविलेच नाही तर आत्मसन्मानाने आपल्या पायावर उभे राहण्याचे बळ देखील दिले आहे. श्री. शंकर बाबा पापळकर यांनी उभ्या केलेल्या वझ्झर मॉडेलचे आज संपूर्ण जगात कौतुक होत आहे. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना २०२४ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

**पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे व डॉ. स्मिता कोल्हे**

नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसची पदवी प्राप्त केल्यानंतर वैद्यकीय व्यवसायात न रमता मेळघाटातील अत्यंत दुर्गम अशा वैरागड परिसरात आपली सेवाभावी आरोग्य सेवा आरंभ केली. विलासी जीवनाचा त्याग करून अत्यंत साधी राहणीमान तसेच वर्तनातून डॉ. रवींद्र कोल्हे व डॉ. स्मिता कोल्हे यांनी शाश्वत जीवनाचा आदर्श संपूर्ण जगापुढे ठेवला. बालमृत्यू तसेच कुपोषणाच्या गर्तेत सापडलेल्या मेळघाटात डॉ. रवींद्र कोल्हे व डॉ. स्मिता कोल्हे हे दांपत्य भूमका आदी रूढी परंपरेत अडकलेल्या आदिवासींना वैद्यकीय उपचाराबाबत जागरूक करण्याचे


पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे | पद्मश्री डॉ. रविंद्र कोल्हे | पद्मश्री डॉ. शंकरबाबा पापळकर | पद्मश्री डॉ. विलास डांगरे | पद्मश्री सत्यनारायण नुवाल | पद्मश्री नामदेव कांबळे | पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम | पद्मश्री डॉ. धनंजय सगदेव

अतुल्य कार्य चार दशकांपासून अविरत करत आहे. डॉ. रवींद्र कोल्हे व डॉ. स्मिता कोल्हे हे दांपत्य महाराष्ट्रातील आदिवासी भागातील आरोग्य सेवा सुधारण्याचे प्रणेते आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना २०२० मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

**पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम**

नागपूर शहरातील प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी वैद्यकीय क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले आहे. न्यूरोलॉजी, शैक्षणिक, संशोधन अध्यापन आरोग्य जागरूकता आणि सामाजिक उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याने त्यांना २०२४ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

**पद्मश्री श्री. नामदेवराव कांबळे**

एक प्रसिद्ध मराठी लेखक पत्रकार आणि शिक्षक असलेले पद्मश्री श्री नामदेवराव कांबळे यांनी वंचित घटकांच्या आणि शेतमजुरांच्या वेदना आपल्या साहित्यातून मांडण्याचे कार्य केले आहे. साहित्य क्षेत्रातील योगदानामुळे श्री नामदेवराव कांबळे यांना २०२१ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**पद्मश्री डॉ. धनंजय सगदेव**

मूळचे नागपूर येथील असलेले पद्मश्री डॉ. धनंजय सगदेव हे केरळ राज्यातील वायनाड येथील आदिवासींसाठी चार दशकाहून अधिक काळ कार्य करीत आहे. आदिवासी क्षेत्र तसेच वैद्यकीय सेवेतील अतुलनीय कार्याबद्दल त्यांना २०२१ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

**पद्मश्री डॉ. परशुराम खुणे**

पूर्व विदर्भातील झाडीपट्टी रंगभूमीवरील अत्यंत लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेते आणि समाजसेवक म्हणून पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांची ख्याती आहे. त्यांना झाडीपट्टीचे दादा कोंडके म्हणून देखील ओळखले जाते. आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागात केलेल्या उत्कृष्ट कला व समाजसेवेसाठी डॉ. परशुराम खुणे यांचा २०२३ मध्ये पद्मश्री पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे.

**पद्मश्री डॉ. विलास डांगरे**

नागपूरच नव्हे तर संपूर्ण विदर्भात होमिओपॅथीचे भीष्म पितामह तसेच प्रसिद्ध होमिओपॅथी तज्ञ म्हणून डॉ. विलास डांगरे यांची ओळख आहे. होमिओपॅथिक औषध, जटिल आवाज आणि श्वसन विकार असलेल्या रुग्णांवर उपचार तसेच आरोग्य क्षेत्रात ५० वर्षांपासून अविरतपणे रुग्ण सेवेच्या कार्याची दखल घेत त्यांना २०२५ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले

**पद्मश्री श्री सत्यनारायण नुवाल**

नवोपक्रम आणि सामाजिक कार्यातून औद्योगिक जगतात वेगळी ओळख पद्मश्री श्री सत्यनारायण नुवाल यांनी निर्माण केली आहे. सोलर इंडस्ट्रीचे संस्थापक पद्मश्री श्री सत्यनारायण नुवाल यांचा व्यवसाय केवळ भारतापुरता मर्यादित नाही तर जगभरातील ९० देशांमध्ये पसरलेला आहे. औद्योगिक विकास रोजगार निर्मिती सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्र उभारणीमध्ये महत्त्वाची भूमिका असल्याने त्यांचा २०२६ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

**पद्मश्री श्री जनार्दनपंत बोते**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अत्यंत जवळचे सहकारी स्वीय सहाय्यक आणि अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस पद्मश्री श्री जनार्दनपंत बोते यांनी गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती ग्राम स्वच्छता सामूहिक प्रार्थनेचा संदेश घराघरात पोहोचविण्याचे कार्य केले आहे. वंचित घटकांसाठी त्यांनी १९७२ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षण संस्था स्थापन केली या अंतर्गत अनेक निवासी शाळा आणि वसतिगृहे सुरू केली आहेत. राष्ट्रसंतांचा ग्रामोद्धार आणि ग्रामगीता या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या त्यांच्या या निस्वार्थ समाजकार्याची दखल घेत २०२६ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

---

# येवदा येथे घाणीचे साम्राज्य; पावसाच्या तोंडावरही ग्रामपंचायत प्रशासन झोपेत!

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : येवदा गावात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून, पावसाळा सुरू झाल्यानंतरही ग्रामपंचायत प्रशासनाने स्वच्छतेच्या कामांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. गावातील मुख्य रस्ते, गटारी, सार्वजनिक ठिकाणे आणि अंतर्गत वस्तीमध्ये कचऱ्याचे ढीग साचले असून सांडपाणी रस्त्यावर वाहत असल्याने दुर्गंधी पसरली आहे.



याचबरोबर आज बायपास रस्त्यावरील नाल्याचा उपसा करण्यात आला. मात्र उपसलेला गाळ व माती रस्त्यालगतच टाकण्यात आल्याने पावसाच्या पाण्यात त्याचे चिखलात रूपांतर झाले आहे. परिणामी दुचाकी, चारचाकी व इतर वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून, पादचारी नागरिकांनाही ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. घसरून अपघात होण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे.

पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचत असल्याने डासांची उत्पत्ती वाढली असून डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांनी अनेक वेळा ग्रामपंचायतीकडे तक्रारी करूनही ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याचे सांगितले जात आहे.गावातील नाल्यांची वेळेत साफसफाई न झाल्याने पावसाचे पाणी तुंबत असून नागरिकांना दैनंदिन हालअपेष्टा सहन कराव्या

## साफसफाईकडे दुर्लक्ष; बायपास रस्त्यावरील नाल्याच्या उपशामुळे चिखलाचे साम्राज्य, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**नागरिकांचा सवाल**

**"पावसाळ्यापूर्वी स्वच्छतेची कामे होणे अपेक्षित असताना ग्रामपंचायत प्रशासन नेमके काय करत आहे? बायपास रस्त्यावर नाल्याचा उपसा करून चिखल तसाच का ठेवण्यात आला? गावाला स्वच्छ, सुरक्षित आणि रोगमुक्त ठेवण्याची जबाबदारी कोणाची?" असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.**

लागत आहेत. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना या अस्वच्छतेचा मोठा फटका बसत आहे.स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत, तातडीने गावातील सर्व भागांची स्वच्छता मोहीम राबवावी, गटारींची साफसफाई करावी, कचऱ्याची नियमित विल्हेवाट लावावी, बायपास रस्त्यावरील चिखल तातडीने हटवावा तसेच आरोग्य विभागाच्या सहकार्याने डास प्रतिबंधक फवारणी करावी, अशी मागणी केली आहे.

---

# परीक्षा पारदर्शक होण्याच्या पार्श्वभूमीवर शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ पुढे ढकलण्याचा निर्णय

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राज्यभरातील १,०२८ केंद्रांवर आयोजित करण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ पुढे ढकलण्यात आली असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे. परीक्षा पारदर्शकत होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत टीईटी परीक्षा सुरक्षित व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या होत्या. तथापि, दि. २७ जून २०२६ रोजी पहाटे मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार भिवंडी येथे काही व्यक्तींना टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत माहिती असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. त्यानुसार भिवंडी पोलिसांनी संबंधित ठिकाणी धाड टाकून तपासणी केली.

या प्रकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी बोलावून पडताळणी करण्यात आली. तपासादरम्यान संबंधित व्यक्तींकडे आढळलेल्या काही प्रश्न आणि शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) जून २०२६ च्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न समान असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने दि. २८ जून २०२६ रोजी नियोजित टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात आला आहे. टीईटी परीक्षेच्या नव्या तारखेसह इतर अद्ययावत माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे परिषदेकडून कळविण्यात आले आहे.

---

# विश्वजीत काईगडे नवे उपविभागीय पोलीस अधिकारी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : विश्वजीत काईगडे यांची सिल्लोडचे नवे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. दिनेश कोल्हे यांची छत्रपती संभाजीनगर मुख्यालयात सीआयडी ब्रांच येथे बदली झाली असून, पुणे पोलीस आयुक्तालयातून विश्वजीत काईगडे यांची नवे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून पदोन्नतीने सिल्लोड येथे बदली करण्यात आली आहे. राज्य शासनाने मंगळवारी पोलीस उपअधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने बदल्या केल्या. सिल्लोड शहर तसेच अजिंठा पोलीस ठाण्यात देखील पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी नवीन पोलीस अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नुकत्याच करण्यात आल्या आहेत.

---


# वाशिम पोलीस दलात मोठा फेरबदल; शिरपूरच्या ठाणेदारपदी योगिता भारद्वाज!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्हा पोलीस दलात २५ जून २०२६ रोजी मोठ्या प्रमाणात प्रशासकीय फेरबदल करण्यात आले असून, जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षकांच्या सार्वत्रिक व प्रशासकीय बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. या आदेशात शिरपूर पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी पोलीस निरीक्षक योगिता भारद्वाज यांची नियुक्ती करण्यात आल्याने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील अनेक पोलीस उपनिरीक्षकांच्या बदल्यांनाही मंजुरी देण्यात आली असून, संपूर्ण पोलीस दलात या आदेशाची जोरदार चर्चा सुरू आहे.

शिरपूर पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार वाघ यांची नुकतीच पदोन्नती झाल्याने हे पद रिक्त झाले होते. त्या रिक्त जागेवर पोलीस निरीक्षक योगिता भारद्वाज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे शिरपूर पोलीस ठाण्याच्या कारभारात नव्या जोमाने कामकाजाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, कारंजा शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार शुक्ला यांचीही पदोन्नती झाल्याने तेथील ठाणेदारपद सध्या रिक्त आहे. जिल्ह्यातील सर्वात महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या पदावर आता कोणाची वर्णी लागणार, याबाबत पोलीस विभागात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे सध्या बॅक ऑफिसमध्ये कार्यरत असलेल्या चार पोलीस निरीक्षकांपैकी कोणाला ही जबाबदारी मिळणार, याकडे संपूर्ण



जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

याच आदेशात जिल्ह्यातील अनेक पोलीस उपनिरीक्षकांच्या प्रशासकीय बदल्यांनाही मंजुरी देण्यात आली आहे. रिसोड पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन रामदास गोखले यांची त्यांच्या विनंतीवरून स्थानिक गुन्हे शाखेत (एलसीबी) बदली करण्यात आली आहे. तर प्रशासकीय कारणास्तव अशोक सिताराम गिते यांची रिसोडवरून अनसिंग येथे, संतोष भगवान शेटे यांची वाशिम ग्रामीणमधून रिसोड येथे, वसंत मारोती ठाकरे यांची कारंजा शहरमधून मंगरुळपीर येथे आणि स्वप्नील चंद्रसिंग चव्हाण यांची कारंजा ग्रामीणवरून धनज येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच शिरपूर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक इम्रानखान युनुसखॉन पठाण आणि मानोरा येथील उपनिरीक्षक अभिजीत संजय बारे यांची कारंजा शहर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. मंगरुळपीरचे दिनकर माधवराव राठोड यांची मानोरा येथे रवानगी करण्यात आली असून, मोटार परिवहन विभागातील गणेश करोडदे यांची पोलीस नियंत्रण कक्षात नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय, वाशिम शहरचे देविदास बापुराव झुंगे आणि अनसिंगच्या कविता अशोक नागरे यांना पोलीस दलात एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. या बदल्यांमुळे जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या कामकाजात नवचैतन्य येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**कारंजा शहरच्या ठाणेदारपदासाठी उत्सुकता शिगेला**

शिरपूर पोलीस ठाण्यावरील नियुक्ती निश्चित झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष कारंजा शहर पोलीस ठाण्याच्या रिक्त ठाणेदारपदाकडे लागले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक या महत्त्वाच्या पदावर कोणावर विश्वास दाखवतात, याची चर्चा पोलीस दलासह राजकीय आणि सामाजिक वर्तुळातही रंगू लागली आहे. आगामी काही दिवसांत या पदावरील नियुक्ती जाहीर होण्याची शक्यता असून, त्याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

---

# बेशिस्त पार्किंग टाळा; आपत्कालीन सेवांचा मार्ग मोकळा ठेवा – मंगेश धावडे

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** घाटकोपर पश्चिम येथील आदिनाथ चौक- महापालिका चौकी ते सुजाता हॉटेल,विद्यादीप शाळा - रामनगर साईनाथ पुत्रण मार्ग या परिसरात मोठ्या प्रमाणावर बेशिस्तपणे दुचाकी पार्क केल्या जात असल्याने नागरिकांसाठी ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.या मार्गावर शाळा असल्यामुळे शाळकरी विद्यार्थी,पालक तसेच ज्येष्ठ नागरिकांना ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.या परिसरात दाट झोपडपट्टी वस्ती असल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका किंवा अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी पोहोचण्यास अडथळा निर्माण होत आहे.त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास त्याचे गंभीर परिणाम नागरिकांना भोगावे लागू शकतात,अशी भीती व्यक्त केली जात आहे.तसेच या परिसरात कोणाचे निधन झाल्यास बेशिस्त दुचाकी पार्किंगमुळे याठिकाणांहून अंत्ययात्रा काढणे देखील कठीण होते.तरी या समस्येकडे गांभीर्याने पाहून दुचाकी चालकांनी रस्त्यावर बेशिस्तपणे वाहने उभी न करता नागरिकांना अडथळा होणार नाही,याची स्वतःहून काळजी घेणे आवश्यक आहे.आज इतरांना होणारा त्रास उद्या स्वतःलाही सहन करावा लागू शकतो,याचे भान प्रत्येकाने ठेवावे,असे आवाहन स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मंगेश धावडे यांनी केले आहे.



# मालेगाव तालुक्यातील शिवसेनेचा बुलंद आवाज... प्रदीप पाटील कुटे!

## शिवसेना (शिंदे गट) मालेगाव तालुकाध्यक्ष प्रदीप पाटील कुटे यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव (वाशिम) राजकारणात अनेक नेते येतात आणि जातात; काही पदामुळे ओळखले जातात, तर काही आपल्या कार्यामुळे जनतेच्या मनावर कायमची छाप सोडून जातात. मालेगाव तालुक्यात असेच एक नाव आज आदराने, विश्वासाने आणि आपुलकीने घेतले जाते, ते म्हणजे शिवसेना (शिंदे गट) मालेगाव तालुकाध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक,गिव्हा कुटे गावचे सरपंच तथा जनसामान्यांचा आधारवड प्रदीप पाटील कुटे.



एका छोट्याशा ग्रामीण गावातून सुरू झालेला हा प्रवास आज हजारो कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा आणि सर्वसामान्यांच्या आशेचा आधार बनला आहे. समाजसेवेची तळमळ, कार्यकर्त्यांवर जीवापाड प्रेम, जनतेसाठी झटण्याची वृत्ती आणि संघटन कौशल्य यामुळे प्रदीप पाटील कुटे यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

प्रदीप पाटील कुटे यांच्या राजकीय प्रवासाला दिशा देणारे पहिले व्यक्तिमत्त्व म्हणजे स्व. अरुण बाबा इंगोले. त्यांच्या सानिध्यात राहून त्यांनी राजकारणातील शिस्त, कार्यकर्त्यांशी नाळ जोडण्याची कला, संघटन उभे करण्याचे तंत्र आणि संघर्षातून विजय मिळविण्याचे धडे घेतले. रिसोड विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीत अरुण बाबा इंगोले यांच्या प्रचाराची मोठी जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. निवडणुकीत थोड्या मतांनी पराभव झाला, मात्र संघर्षाची जिद्द कधीच कमी झाली नाही.

यानंतर त्यांनी स्व. विनायकराव मेटे यांच्या शिवसंग्राम संघटनेत अत्यंत जोमाने काम केले. ग्रामीण भागातील कार्यकर्ते, शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी त्यांनी थेट मेटे साहेबांपर्यंत पोहोचवल्या. अनेक वेळा स्वतःच्या खिशातून खर्च करून सहकाऱ्यांची साथ दिली. त्यांच्यासाठी राजकारण म्हणजे पद नव्हे, तर समाजसेवा हेच ध्येय राहिले.

काळाच्या ओघात अरुण बाबा इंगोले आणि नंतर विनायकराव मेटे यांचे निधन झाले. दोन वेळा डोक्यावरचा आशीर्वादाचा हात निघून गेला, पण प्रदीप पाटील कुठे खचले नाहीत. त्यांनी नव्या उमेदीने आणि नव्या जिद्दीने पुढे वाटचाल सुरू ठेवली.

यानंतर त्यांनी माजी अपराजित खासदार तथा विद्यमान आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केला. आज प्रदीप पाटील कुठे हे आमदार भावनाताई गवळी पाटील यांचे अत्यंत जवळचे, विश्वासू आणि निष्ठावान सहकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या प्रामाणिक कामाची दखल घेत भावनाताईंनी त्यांच्यावर मालेगाव तालुकाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवली.

नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भावनाताईंनी त्यांच्यावर विश्वास व्यक्त करत मालेगावात शिवसेनेचा झेंडा फडकविण्याची जबाबदारी दिली. प्रदीप पाटील कुठे यांनी आपल्या संघटन कौशल्याच्या जोरावर अनेक वर्षांची राजकीय समीकरणे बदलून शिवसेना (शिंदे गट) चे उमेदवार ओमप्रकाश खुरसडे यांना नगराध्यक्षपदी विराजमान करून दाखवले. हा विजय केवळ निवडणुकीचा नव्हता, तर कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा आणि संघटनशक्तीचा विजय होता.

प्रदीप पाटील कुटे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन एका वाक्यात करायचे झाले, तर "डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आणि पायाला भवरा" ही म्हण त्यांच्यासाठी तंतोतंत लागू पडते. संयमी स्वभाव, गोड बोलणे आणि जनतेच्या सेवेसाठी सतत धावपळ करण्याची त्यांची वृत्ती त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

आज मालेगाव तालुक्यातील असंख्य युवक, शेतकरी, महिला, गोरगरीब आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी त्यांचे घर २४ तास खुले असते. कोणत्याही वेळी फोन करा, कोणतीही समस्या सांगा, प्रदीप पाटील कुटे हे ती सोडविण्यासाठी तत्काळ प्रयत्न करतात. कार्यकर्त्याला संकटात कधीही एकटे न सोडणे, ही त्यांची सर्वात मोठी ताकद आहे.

माझ्या मते, प्रदीप पाटील कुठे हे केवळ राजकीय पदाधिकारी नाहीत, तर ते कार्यकर्त्यांच्या आशा-अपेक्षांचे केंद्रबिंदू आहेत. संघर्ष, संघटन, समर्पण आणि समाजसेवा या चार सूत्रांवर त्यांनी आपले नेतृत्व उभे केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली मालेगाव तालुक्यात शिवसेनेची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे.

येणाऱ्या काळात पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिवसेनेचा झेंडा अधिक उंच फडकविण्याची क्षमता प्रदीप पाटील कुठे यांच्यात निश्चितच आहे. त्यांचे नियोजन, कार्यकर्त्यांवरील प्रेम आणि जनतेशी असलेली नाळ पाहता भविष्यात ते आणखी मोठ्या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळतील, असा विश्वास त्यांच्या सहकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना आहे.

**प्रेरणादायी विचार..**

"ज्याच्या मनात कार्यकर्त्यांसाठी प्रेम असते, त्यालाच जनतेच्या मनात स्थान मिळते."

"संघर्ष ज्याचा स्वभाव असतो, विजय त्याच्याच पायाशी येऊन नतमस्तक होतो."

"पदामुळे नेता होत नाही; जनतेच्या विश्वासामुळे नेता घडतो."

"गावच्या मातीतून उभा राहिलेला माणूस जेव्हा हजारो कार्यकर्त्यांच्या आशांचा आधार बनतो, तेव्हाच खऱ्या नेतृत्वाचा जन्म होतो."

"स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी जगणारा माणूसच खऱ्या अर्थाने जननेता ठरतो."

ईश्वरचरणी प्रार्थना आहे की, प्रदीप पाटील कुटे यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड जनसेवेची ऊर्जा आणि यश लाभो. त्यांच्या सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण होवोत आणि त्यांच्या नेतृत्वाखाली मालेगाव तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळो, हीच सदिच्छा. मा. प्रदीप पाटील कुटे साहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक, लाख लाख हार्दिक शुभेच्छा!

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचा पत्रकारांच्या सन्मानासाठी एल्गार



■ जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वात ठाणेदार गणेश हिवरकर यांना निवेदन!
■ खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकार बांधवांना दिलेल्या धमकीचा तीव्र निषेध
■ पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी कठोर उपाययोजनांची मागणी

"पत्रकारांवर होणारे अन्याय, धमक्या आणि दबाव कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. पत्रकारांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षिततेसाठी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ कायम अग्रस्थानी राहील. पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असेल ते सर्व लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल."

करण धोंगडे
वाशिम जिल्हाध्यक्ष,
निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ,

"पत्रकारांच्या सुरक्षिततेसंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाची गांभीर्याने दखल घेण्यात येईल. कायद्याच्या चौकटीत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल."

– गणेश हिवरकर
ठाणेदार, जऊळका पोलीस स्टेशन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या कोणत्याही प्रकाराला मुळीच थारा दिला जाणार नाही, असा ठाम संदेश देत निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, वाशिम यांच्या वतीने आज जऊळका पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश हिवरकर साहेब यांना पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी व पत्रकारांशी गैरवर्तनाच्या निषेधार्थ निवेदन सादर करण्यात आले. संघाचे वाशिम जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले.अलीकडे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकार परिषदेदरम्यान पत्रकार बांधवांशी धमकीची भाषा वापरल्याचा प्रकार समोर आल्यानंतर राज्यभरातून त्याचा निषेध व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाने पत्रकारांच्या सन्मान आणि सुरक्षिततेचा मुद्दा उचलून धरत पोलीस प्रशासनाकडे योग्य ती खबरदारी घेण्याची मागणी केली.निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार समाजातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य करतात. शासन, प्रशासन आणि जनतेदरम्यान महत्त्वाचा दुवा म्हणून ते काम करतात. त्यामुळे पत्रकारांना धमकावणे, दबाव टाकणे किंवा अपमानास्पद वागणूक देणे हे केवळ एका व्यक्तीवरचे कृत्य नसून लोकशाही मूल्यांवरच आघात करणारे आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून संबंधित यंत्रणांनी कठोर भूमिका घ्यावी,अशी मागणी करण्यात आली.निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे लाडके राष्ट्रीय अध्यक्ष गणेश गजकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटना सातत्याने लढा देत असून पत्रकारांवरील अन्यायाविरोधात राज्यभरात संघटना भक्कमपणे उभी राहत आहे. पत्रकारांचा सन्मान, सुरक्षितता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राहावे, हा संघटनेचा प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

हे निवेदन जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या अध्यक्षतेखाली सादर करण्यात आले.

धोंगडे हे दैनिक युवक आधारचे वाशिम जिल्हा प्रतिनिधी, तसेच माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हा संघटक म्हणूनही काम पाहत आहेत पत्रकार व सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आहेत.

यावेळी माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे वाशिम जिल्हा उपाध्यक्ष डॉ. भागवत कालापाड हे उपस्थित होते. त्यांनी पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी सर्व संघटनांनी एकत्र येऊन लढा उभारण्याची गरज व्यक्त केली.

निवेदन स्वीकारताना ठाणेदार गणेश हिवरकर यांनी निवेदनाची गांभीर्याने दखल घेत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# काँग्रेस नेते संजय दत्त यांची हरियाणाच्या प्रभारीपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई. /प्रतिनिधी** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार संजय दत्त यांची हरियाणाच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने त्यांच्यावर ही नवी जबाबदारी सोपवली आहे. संजय दत्त हे काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव असून यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आणि विधान परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. हिमाचल प्रदेश व तामिळनाडूचे सहप्रभारी म्हणूनही त्यांनी याआधी काम केले आहे.

“काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गेजी, विरोधी पक्षनेते राहुल गांधीजी व वरिष्ठ नेत्यांनी माझ्यावर मोठा विश्वास व्यक्त करून ही जबाबदारी दिली त्याबद्दल मी या नेतृत्वाचा आभारी आहे. मी काँग्रेस पक्षाचा एक निष्ठावान शिपाई असून वरिष्ठांनी माझ्यावर सोपवलेल्या जबाबदारीला न्याय देण्याचा प्रयत्न करेन. हरिणात आगामी काळात पक्ष संघटना बळकट करून काँग्रेसचे सरकार आणणे व २०२९ साली राहुल गांधी जी यांना पंतप्रधान करण्यासाठी पक्षाची ताकद वाढवण्यावर आपाला भर असेल”, असे संजय दत्त यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी लाखनीच्या सागर साखरे यांची पंचपदी निवड; भंडारा जिल्ह्याचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** दि. ३० जून ते ४ जुलै दरम्यान नागपूर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ७ वर्षाखालील मुला-मुलींच्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी लाखनी येथील युवा बुद्धिबळ तज्ञ सागर साखरे यांची पंच (Arbiter) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी पंचपदी निवड होणारे ते भंडारा जिल्ह्यातील एकमेव प्रतिनिधी ठरले आहेत.



बुद्धिबळ क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याचा, अभ्यासाचा आणि अनुभवाचा गौरव म्हणून त्यांची ही निवड करण्यात आली असून, त्यामुळे लाखनीसह संपूर्ण भंडारा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पंच म्हणून जबाबदारी सांभाळण्याची संधी मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब मानली जात आहे. या यशाचे संपूर्ण श्रेय सागर साखरे यांनी आपल्या आई-वडिलांना दिले असून, बुद्धिबळ क्षेत्रातील वाटचालीत मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य करणारे भूषण श्रीवास आणि एस. एस. सोमण सर यांच्याप्रती त्यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली आहे.

सागर साखरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संघटनेचे नरेंद्रकुमार रंगारी, शाहेद कुरेशी तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.राष्ट्रीय स्पर्धेतील ही नियुक्ती सागर साखरे यांच्या कार्याचा सन्मान तर आहेच, शिवाय भंडारा जिल्ह्यातील बुद्धिबळ क्षेत्रातील नवोदित खेळाडूंना प्रेरणा देणारी ठरत आहे.

# विदर्भ राज्याच्या लढ्याला बळ देण्यासाठी यवतमाळात आढावा बैठक; २५ जुलैच्या संकल्प मेळाव्यासाठी कार्यकर्त्यांना सज्ज होण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने शुक्रवारी (दि. २६ जून) यवतमाळ जिल्हा आढावा बैठक व जिल्हा संपर्क दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. माजी आमदार अँड. वामनराव चटप, जिल्हाध्यक्ष कृष्णाजी भोंगाडे आणि जिल्हा समन्वयक तथा संपर्क प्रमुख मधुसूदन कोवे गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत स्वतंत्र विदर्भ राज्याच्या आंदोलनाला अधिक बळकटी देण्यासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

बैठकीत पत्रकारांशी उर्मट भाषेत वागणाऱ्या सत्ताधारी लोकप्रतिनिधींचा तीव्र निषेध करण्यात आला. पत्रकारांचा अपमान हा लोकशाही मूल्यांवर घाला असल्याचे मत व्यक्त करत समितीने अशा प्रवृत्तीविरोधात आवाज उठविण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी येत्या २५ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या "विदर्भ राज्य निर्माण संकल्प मेळावा" यशस्वी करण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

बैठकीदरम्यान कळंब तालुक्यातील प्रा. मार्तंड खुपसे यांची विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या कोअर कमिटी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. त्यानिमित्त संपर्क दौऱ्यात त्यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

संपर्क दौऱ्यादरम्यान कळंब, जोडमोहा, मेटीखेडा आणि डोंगरखर्डा जिल्हा परिषद सर्कलमध्ये शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांशी संवाद साधण्यात आला. यावेळी अँड. वामनराव चटप यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीसाठी सर्व स्तरातील नागरिकांनी एकजुटीने पुढे येण्याचे आवाहन केले. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेल्या मधुसूदन कोवे गुरुजी यांना जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून देण्याचे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.




पांढरकवडा येथील रेस्ट हाऊसमध्ये आयोजित संवाद सभेला महिला जिल्हाध्यक्ष प्रा. मंजुषा तिरपुडे, माजी नगराध्यक्ष शंकर बडे, शेतकरी नेते मोहन मामिडवार, अयुब शेख यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. त्यानंतर जगदंब देवस्थान येथे शंकर बडे यांनी अँड. वामनराव चटप आणि उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व जगदंबा मातेची प्रतिमा देऊन सत्कार केला.

यावेळी शेतकरी नेते मोहन मामिडवार यांनी लवकरच शेतकरी मेळावा आयोजित करण्याची घोषणा केली. तसेच २५ जुलै रोजी होणाऱ्या विदर्भ राज्य निर्माण संकल्प मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्याचा निर्धार व्यक्त केला.

दौरा यशस्वी करण्यासाठी जिल्हा समन्वयक तथा संपर्क प्रमुख मधुसूदन कोवे गुरुजी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या दौऱ्यात कृष्णाजी भोंगाडे, प्रा. हेमंत मुदलियार, चारुदत्त नेरकर, अशोकराव कपिले, प्रा. मार्तंड खुपसे, अशोकराव उमरतकर, प्रशांत मडावी, शंकर बडे, मोहनराव मामिडवार, प्रा. मंजुषा तिरपुडे, विजय डेहणकर, विनोद देशमुख, अयुब शेख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे आभार मधुसूदन कोवे गुरुजी यांनी मानले.